जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक




नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अवमानाच्या निषेधार्थ भिंगारमध्ये बंद; व्यापारी आणि नागरिकांचा प्रतिसाद

नगर – महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांविषयी अवमानकारक मजकूर लिहिलेली कागदे उड्डाणपुलावरून इम्पिरियल चौकात भिरकावल्याच्या निषेधार्थ ११ ऑक्टोबर रोजी भिंगार मध्ये आंबेडकरी संघटना व हिंदुत्ववादी संघटनांनी बंद पुकारला होता. यात सर्व व्यापारी, नागरिक यांनी सहभाग घेत बंदला उत्स्फुर्त प्रतिसाद दिला.

महामानवाच्या अवमानाची ही घटना ६ ऑक्टोबर रोजी सायंकाळी समोर आली होती. यातील आरोपी फरीद सुलेमान खान, (वय ३०, रा. आक्सा मस्जीद जवळ, आलमगिर, भिंगार) याला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अवघ्या २४ तासांच्या आत पकडले होते. पोलिस तपासात त्याने मला शहरात दंगल घडवायची होती अशी माहिती दिल्याने नगर व भिंगार मध्ये संताप व्यक्त होत आहे. सदरचा आरोपी हा भिंगार मधील असल्याने शहरातील आंबेडकरी संघटना व हिंदुत्ववादी संघटनांनी एकत्र येत या घटनेच्या निषेधार्थ ११ ऑक्टोबर रोजी भिंगार शहर बंद पुकारला होता. शहरातील सर्व दुकाने व इतर व्यवहार यामध्ये बंद ठेवण्यात आल्याने शहरात सर्वत्र शुकशुकाट दिसून आला.




डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अवमानाच्या निषेधार्थ भिंगारमध्ये बंद पाळण्यात आला. त्यावेळी बंद असलेली दुकाने व रस्त्यावर असलेला शुकशुकाट. (छाया – बबलू शेख)

यावेळी प्रतिक्रिया देताना विविध संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी या घटनेचा तीव्र निषेध नोंदवला. तसेच सदर आरोपीचे भिंगार मध्ये मेडिकल दुकान असून त्याचा दुकानाचा परवाना कायमचा रद्द करावा अशी मागणी जिल्हाधिकाऱ्यांकडे करण्यात आली. तसेच या घटनेच्या निषेधार्थ नगर शहरात शिवशक्ती भीमशक्तीच्या वतीने जुन्या बसस्थानकाजवळील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यापासून दिल्लीगेट पर्यंत निषेध मोर्चा काढण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

या बंद च्या पार्श्वभूमीवर भिंगार कॅम्प पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक जगदीश मुलगीर यांच्या नेतृत्वाखाली ६ अधिकारी आणि ४० पोलिस कर्मचाऱ्यांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. सदर बंद दुपारी १२ वाजेपर्यंत पुकारण्यात आला होता, त्यानंतर सर्व व्यवहार सुरळीत सुरु झाले आहेत. बंद दरम्यान कुठलाही अनुचित प्रकार घडला नाही. बंद शांततेत पार पडला असल्याचे स.पो.नि. मुलगीर यांनी सांगितले.

## श्री बेलेश्वर महादेव मंदिरात १३ ऑक्टोबरला चांदीचा मुकुट अर्पण सोहळ्याचे आयोजन

### स्टेट बँक चौकातून संध्याकाळी मिरवणूक; महाआरती व महाप्रसाद



नगर – भिंगार, भुईकोट किल्ला परिसरातील श्री बेलेश्वर महादेव मंदिर येथे १३ ऑक्टोबर रोजी चांदीचा मुकुट अर्पण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. भगवान शंकराच्या या ऐतिहासिक देवस्थानात पहिल्यांदाच हा सोहळा रंगणार आहे.

या सोहळ्याची सुरुवात सायंकाळी ६ वाजता स्टेट बँक चौकातून निघणाऱ्या मिरवणुक काढण्यात येणार आहे. यानंतर रात्री ८ वाजता मंदिरात श्री बेलेश्वर महादेवांना चांदीचा मुकुट अर्पण केला जाणार असून, त्या वेळी विशेष महाआरती आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

या धार्मिक सोहळ्याचा लाभ घेण्यासाठी सर्व श्रद्धाळू भक्तांना आयोजक मंडळाने उपस्थित राहण्याचे आवाहन या सोहळ्याचे संयोजक लक्ष्मण (आबा) कचरे, संतोष कानडे, गणेश लालबागे, संदीप गुजर यांनी केले आहे. या सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी श्री बेलेश्वर आरती ग्रुप आणि आदिशक्ती सार्वजनिक मित्र मंडळ प्रयत्नशील आहेत.

### तांदळी वडगावच्या सरपंच

## सौ. छायाताई घिगे यांचे अल्प आजाराने निधन



नगर – नगर तालुक्यातील तांदळी वडगाव गावच्या विद्यमान सरपंच सौ. छायाताई मोहन घिगे (वय ६२) यांचे १० ऑक्टोबर रोजी रात्री अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर ११ ऑक्टोबर रोजी सकाळी गावातील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात पती, दिपक व उपेंद्र ही दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. मयत छायाताई या सन २०२२ पासून तांदळी वडगाव ग्रामपंचायतच्या सरपंच म्हणून कार्यरत होत्या. नगर तालुका बाजार समितीचे माजी सभापती अभिलाष घिगे यांच्या त्या चुलती होत.

# सर्व महापुरुषांच्या पुतळ्याभोवती सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात यावे

नगर – महापुरुषांच्या कार्याची व त्यांच्या त्यागचे स्मरण व्हावे म्हणून पुतळे भरले जातात यामुळे समाजाला ऊर्जा व प्रेरणा मिळते. पुतळ्याच्या माध्यमातून त्या व्यक्तीने राष्ट्रासाठी किंवा समाजासाठी केलेल्या योगदानाची आठवण होते तसेच भावी पिढीला आपला इतिहास आणि संस्कृती समजते. त्या व्यक्तीने केलेल्या कार्याचा गौरव व्हावा म्हणून पुतळे उभारले जातात. महापुरुषांनी घालून दिलेल्या न्याय, समानता, स्वातंत्र्य सारख्या तत्त्वज्ञानाचे पुतळे हे दृश्य प्रतीक बनतात. जोपर्यंत समाज महापुरुषांच्या विचारांना आपल्या रोजच्या जीवनात आचरणात आणत नाही तोपर्यंत पुतळे उभारण्याचा पूर्ण उद्देश सफल होत नाही. अनेकदा पुतळ्यांचा वापर राजकीय मतांसाठी केला जातो. पुतळ्यांच्या विटंबेनेवरून समाजात तीव्र मतभेद आणि जातीय तणाव निर्माण होतो यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो. त्यामुळे पुतळे उभारताना संबंधित संस्थेत काही अटी व शर्तींचे पूर्णपणे पालन करावे लागते. त्या अटी आणि शर्ती खालील प्रमाणे

१) पुतळ्याच्या ठिकाणी २४ तास संरक्षणा करिता संरक्षण कर्मचारी नियुक्त असावा.

२) पुतळ्याभोवती पुरेशे प्रकाश दिवे बसविण्यात यावेत.

३) पुतळ्यांभोवती चारही बाजूने सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात यावेत.

४) पुतळ्यां भोवती भिंतींचे कुंपण करण्यात यावे व पुतळ्याची विटंबना होणार नाही या दृष्टिकोनातून संबंधित संस्थे कडून खबरदारी घेण्यात यावी.

वरील सर्व अटी आणि शर्तींची पालन केले जाईल या सबबीवर महानगरपालिकेस महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास (मार्केट यार्ड चौक) परवानगी देण्यात आलेली आहे. कदाचित हाच नियम जाणता राजा छत्रपती शिवाजी महाराजांच्या बस स्थानकावरील, राष्ट्रपिता महात्मा गांधींच्या वाडिया पार्क येथील तसेच इतर महापुरुषांच्या पुतळ्यास हाच नियम असेल. परंतु या ठिकाणी चारही बाजूने cctv निदर्शनास येत नाही.

स्वतःची राजकीय पोळी भाजून घेण्यासाठी काही समाजकंटक या महापुरुषांच्या पुतळ्यांची काही आमीष दाखवून विटंबना करण्यास युवकांस प्रवृत्त, भाग पाडतात. यामुळे समाजा समाजात द्वेष, तेढ निर्माण झाल्याने कायदा व सुव्यवस्था प्रश्न निर्माण होतो. हकनाक थोड्याशा स्वार्थासाठी युवक बळी पडल्याने पूर्ण समाज वेठीस धरला जातो.

आता निवडणूका जाहीर होत आहेत आणि पुढील काही महिन्यात अ.नगर महानगरपालिकेची निवडणूका आहे. या निवडणुकीपूर्वी मोठे षडयंत्र करुन गुण्यागोविंदाने एकत्र राहणाऱ्या सर्व समाजात तेढ निर्माण करून अप्रिय घटना घडविल्या जातील व त्याच दिशेने वाटचाल चालू असल्याचे निदर्शनास येत आहे म्हणून या अप्रिय घटना घडू नये म्हणून सर्व महापुरुषांच्या पुतळ्याभोवती चारी बाजूने सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात यावेत, अशी मागणी मुकूंदनगर येथील शेख शहाजान फकीर (मो. ८३२९६१७३४३) यांनी अहिल्यानगर महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे यांना निवेदनाद्वारे केली आहे.

## नगर शहरात विनापरवाना फ्लेक्स लावणाऱ्या दोघांवर महापालिकेकडून गुन्हा दाखल



नगर – शहरात विनापरवाना फ्लेक्स लावणाऱ्यांवर महापालिकेने कारवाईचा बडगा उगारला आहे. प्रेमदान चौक व नागापूर पुलाजवळ दोन ठिकाणी लावण्यात आलेल्या फ्लेक्स प्रकरणी महानगरपालिकेने तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद देऊन गुन्हा दाखल केला आहे. परवानगीशिवाय फ्लेक्स लावून विद्रुपीकरण केल्यास कठोर कारवाई करणार आहे. फौजदारी व दंडात्मक अशा दोन्ही स्वरूपाच्या कारवाया केल्या जातील, असा इशारा आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी दिला आहे.

सावेडी प्रभाग कार्यालयाचे प्रभाग अधिकारी बाळासाहेब लक्ष्मण पवार यांनी फिर्याद दिली आहे. अहिल्यानगर – मनमाड रोड, प्रेमदान चौक, कोहिनुर मॉलसमोर, सावेडी येथे रस्त्याच्या मध्यभागी लाईटच्या खांबाला मंगलमुर्ती वास्तु प्रा. लि. या नावाचा साधाराण फ्लेक्स बोर्ड बेकायदेशीर लावण्यात आलेला होता. तसेच नागापुर येथे पुलाच्या बाजूला रस्त्याच्या मध्यभागी लाईटच्या खांबाला आकाश कातोरे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा असा फ्लेक्स बोर्ड लावला होता. सदर फ्लेक्स बोर्ड काढून जप्त करण्यात आलेले आहेत. सदर फ्लेक्स बोर्ड लावल्याप्रकरणी उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार फिर्याद देऊन गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शहरात विनापरवाना फ्लेक्स लावू नये, असे आवाहन वारंवार केले जात आहे. अनधिकृत फ्लेक्सवर कारवायाही सुरू आहेत. यापुढे विनापरवाना फ्लेक्स आढळल्यास फौजदारी व दंडात्मक अशा दोन्ही स्वरूपाच्या कारवाया केल्या जाणार असल्याचे यशवंत डांगे यांनी स्पष्ट केले.

## ताराबाई शिपणकर यांचे अल्प आजाराने निधन



नगर – येथील रेल्वे स्टेशन मल्हार चौक परिसरातील रहिवासी ताराबाई एकनाथ शिपणकर (वय ७४) यांचे १० ऑक्टोबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले, २ मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. बीएसएनएलचे स्टाफ विजय शिपणकर यांच्या त्या मातोश्री होत.

## ॲड. देविदास गाली यांचे अल्प आजाराने निधन



नगर – चितळेरोड, आनंदी बाजार, पोस्ट ऑफिस पाठिमागे येथील रहिवाशी ॲड.देविदास इस्तारी गाली (वय ४८) यांचे ११ ऑक्टोबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले.

त्यांच्यावर नालेगाव येथील अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, आई, ३ भाऊ, भावजया, मुलगा असा परिवार आहे.

## सुरेश चौरे यांचे अल्प आजाराने निधन



नगर – नेप्ती येथील सुरेश मारुती चौरे (वय ७६) यांचे १० ऑक्टोबरला अल्प आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्यावर नेप्ती येथील अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात पत्नी, २ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

## दिलीप पाडळे यांचे आकस्मिक निधन



नगर – सर्जेपुरा, कौलारु येथील रहिवाशी दिलीप उर्फ पप्पू गोविंद पाडळे (वय ६५) यांचे १० ऑक्टोबरला आकस्मिक निधन झाले.

त्यांच्यावर नालेगाव येथील अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात २ मुले, १ मुलगी, जावई, सूना, नातवंडे असा परिवार आहे. विनीत, सुमीत पाडळे यांचे वडील होत.

## सौ.गीता दुधाळ यांचे अल्पश: आजाराने निधन



श्रीरामपूर – येथील सौ.गीता संजय दुधाळ (वय ५१) यांचे अल्पश: आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात सासू-सासरे, पती, दोन मुले, दिर, सुना, पुतणे असा परिवार आहे.

दुधाळवस्ती येथील शेतकरी रामभाऊ रखमाजी दुधाळ यांच्या सुनबाई, माळी बोर्डिंगचे संचालक संजय दुधाळ यांच्या पत्नी होत. तहसील कार्यालयातील कर्मचारी चेतन दुधाळ व ऋषिकेश दुधाळ यांच्या मातोश्री, एकनाथ व राजेंद्र दुधाळ यांच्या भावजई होत.

# मंदिरांमध्ये चोरी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

### मंदीर चोरीचे १५ गुन्हे उघडकीस ४ लाख ८३ हजारांचा मुद्देमाल हस्तगत

नगर – नगर जिल्ह्यात विविध ठिकाणी मंदिरांमध्ये चोऱ्या करणाऱ्या टोळीचा स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पर्दाफाश केला आहे. सराईत गुन्हेगारांच्या ७ जणांच्या टोळीतील चौघांना पकडत त्यांच्या कडून चोरीचा ४ लाख ८३ हजारांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. या टोळीकडून जिल्ह्यात १५ मंदिरात चोऱ्या केल्याचे उघड झाले आहे.

पकडलेल्या आरोपींमध्ये रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार राहुल किशोर भालेराव (रा. वडाळा महादेव, ता. श्रीरामपुर), रामेश्वर ज्ञानदेव धनेश्वर (रा. इंदिरानगर, भोकर ता. श्रीरामपुर), एकनाथ नारायण माळी (रा. ममदापुर ता. राहाता हल्ली रा. बिरोबा बन, शेतकरी हॉटेल मागे, शिर्डी), शत्रुघ्न मुरलीधर मोरे (रा. टाकळी मानुर, ता. पाथर्डी), यांचा समावेश असून त्यांचे साथीदार राहुल भाऊसाहेब माळी (रा. बिरोबा बन, शेतकरी हॉटेल मागे, काच मंदीर रोड, भिल वस्ती, शिर्डी), पांडु उर्फ दत्तु बाबासाहेब मोरे (रा. भोकर, ता. श्रीरामपुर), पांडु उर्फ दत्तु बाबासाहेब मोरे व त्यांचा एक अनोळखी मित्र असे फरार आहेत. या सर्वांनी मागील ७ ते ८ महिन्यांमध्ये अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये मंदीरामध्ये चोऱ्या केल्या असल्याची कबुली पकडलेल्या आरोपींनी दिली आहे. या आरोपींकडून ४ लाख ८३ हजार किमतीचा मुद्देमाल त्यामध्ये रोख रक्कम, सोन्याचे – चांदीचे दागिने, गुन्ह्याचे वेळी वापरलेल्या दोन मोटारसायकल, मोबाईल असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



जिल्ह्यात मंदिरांमध्ये चोऱ्या करणाऱ्या टोळीला पकडल्यानंतर त्यांच्या समवेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

पाथर्डी तालुक्यातील करोडी येथील शनिमारुती मंदीराची दानपेटी अज्ञात आरोपींनी फोडून ३ लाख ५० हजारांची रोकड ४ ते ५ ऑक्टोबर दरम्यान चोरून नेली होती. याबाबत पाथर्डी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलिस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांच्या सूचनेनुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. किरणकुमार कबाडी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेतील स.पो.नि. हरिष भोये, पोलीस अंमलदार सुरेश माळी, गणेश लोंढे, विष्णु भागवत, फुरकान शेख, राहुल डोके, आकाश काळे, अमृत आढाव, बाळासाहेब गुंजाळ, रोहित येमुल, प्रशांत राठोड, महादेव भांड महिला पोलीस अंमलदार सोनल भागवत यांचे पथक समांतर तपास करत होते. या तपासादरम्यान पथकाने ही टोळी जेरबंद केली आहे.

आरोपी राहुल किशोर भालेराव हा रेकॉर्डवरील आरोपी असुन त्याचेविरुध्द यापुर्वी अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यामध्ये दरोडा तयारी, जबरी चोरी, सरकारी कामात अडथळा आणणे, घरफोडी, चोरीचे १९ गुन्हे दाखल आहेत.

## पुनर्विवाह करूनही विधवा दाखवणाऱ्या शिक्षिकांवर कारवाई करण्याची मागणी

### नोकरी, बदली, पदोन्नती आणि विविध शासन सवलतींसाठी होतेयं वापर



नगर – विधवा असलेल्या आणि पुनर्विवाह करूनही शासनाच्या विविध योजनांचा लाभ विधवा म्हणून घेत असलेल्या शिक्षिकांवर तात्काळ फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई) कडून करण्यात आली आहे. या मागणीचे निवेदन रिपाईचे भिंगार शहराध्यक्ष स्वप्नील साठे यांनी पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी यांना दिले.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, जिल्ह्यात सध्या अनेक विधवा शिक्षिका कार्यरत आहेत. या शिक्षिकांकडे विधवा प्रमाणपत्र असून त्या प्रमाणपत्राचा वापर नोकरी, बदली, पदोन्नती आणि विविध शासन सवलतींसाठी केला जातो. मात्र, या शिक्षिकांपैकी अनेकांनी पुनर्विवाह करून नव्याने संसार सुरू केला असून, काहींना मुलेही झाली आहेत. तरीसुद्धा त्यांनी शासनास पुनर्विवाहाबाबत माहिती दिली नाही.

स्वप्नील साठे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, या शिक्षिका आपल्या पतींसह विविध सामाजिक कार्यक्रमात सहभागी होतात, सोशल मीडियावर त्यांचे एकत्र फोटो दिसतात, तरीही त्या शासनाच्या नोंदीत विधवा म्हणून ओळखल्या जातात. या माध्यमातून शासनाची, समाजाची आणि विद्यार्थ्यांची फसवणूक होत आहे असे गंभीर आरोप करण्यात आले आहेत.

रिपब्लिकन पार्टीने प्रशासनाकडे मागणी केली आहे की, तालुक्यातील सर्व विधवा शिक्षिकांची वैवाहिक स्थिती तपासावी, त्यांच्यावरील सेवा पुस्तके आणि सोशल मीडिया रेकॉर्ड तपासून सत्यता जाणून घ्यावी. या संदर्भात दरवर्षी जसे हयातीचे दाखले घेतले जातात, त्याचप्रमाणे विधवांच्या वैवाहिक स्थितीचे पडताळणी प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

रिपाईने असा आरोप केला की, या प्रकरणाकडे प्रशासनातील काही अधिकारी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असून, अशा खोट्या शिक्षिकांना अभय देत आहेत. त्यामुळे खऱ्या विधवांवर अन्याय होत आहे, म्हणूनच खोट्या माहितीच्या आधारे लाभ देणाऱ्या जबाबदार अधिकारी व कर्मचाऱ्यांवर देखील कारवाई करण्यात यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

## कत्तल करण्यासाठी आणलेल्या १३ गोवंशीय जनावरांची सुटका

### झेंडीगेट परिसरातून २०० किलो गोमांसही केले जप्त, २ गुन्हे दाखल

नगर – कत्तलीसाठी आणलेल्या १३ गोवंशीय जनावरांची स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सुटका करत दोघांवर नेवासा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. तर दुसऱ्या पथकाने नगर शहरातील झेंडीगेट परिसरात छापा टाकून २०० किलो गोमांस जप्त करत दोघांच्या विरुद्ध कोतवाली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. या दोन्ही कारवाया ११ ऑक्टोबर रोजी करण्यात आल्या आहेत.



नगर शहरातील झेंडीगेट परिसरात दोघांकडून २०० किलो गोमांस पकडल्यानंतर त्यांच्यासमवेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी स्थानिक गुन्हे शाखेस जिल्ह्यामध्ये गोवंशीय जनावरांची कत्तल करणारे इसमांची माहिती काढुन कारवाई करणेबाबत आदेश दिलेले आहेत. त्यानुसार पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांचे मार्गदर्शनाखालील स्थानिक गुन्हे शाखेतील उपनिरीक्षक दिपक मेढे व पोलीस अंमलदार सुनिल पवार, शाहिद शेख, विष्णु भागवत, अतुल लोटके, गणेश धोत्रे, दिपक घाटकर, पंकज व्यवहारे, सोमनाथ झांबरे, भाऊसाहेब काळे, सागर ससाणे, सतिष भवर, चालक भगवान धुळे, उमाकांत गावडे यांची दोन पथके नेमण्यात आली आहेत.

ही पथके नगर शहर व नेवासा येथे माहिती घेत असताना त्यांना मिळालेल्या माहिती वरून एका पथकाने झेंडीगेट परिसरातील बेपारी मोहल्ला येथे छापा टाकून २०० किलो गोमांस जप्त केले. या प्रकरणी इरफान फारुक कुरेशी (वय ३४), शकील बाबासाहेब कुरेशी (वय ३५, दोघे रा. बेपारी मोहल्ला, झेंडीगेट) यांच्या विरुद्ध कोतवाली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दुसऱ्या कारवाईत मुजाहिद अमिर शेख व मोहसिन शब्बीर शेख (दोघे रा. सलाबतपुर ता. नेवासा) यांच्या ताब्यातून कत्तलीसाठी आणलेल्या १३ गोवंशीय जनावरांची सुटका करत दोघांवर नेवासा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### हिरव्या मिरच्यांचे आरोग्यदायी फायदे

हिरव्या मिरच्यांशिवाय भारतीय जेवण अपूर्ण आहे. काही हिरव्या मिरच्या घातल्याने चव दुप्पट होते. ते केवळ चव वाढवत नाही तर आरोग्यासाठी देखील एक खजिना आहे. हिरव्या मिरच्यांमधील कॅप्सेसिन त्यांना मसालेदार बनवते. ते शरीरात फील-गुड हार्मोन एंडोर्फिन वाढवते, ज्यामुळे वेदना कमी होतात आणि मूड सुधारतो. ते लठ्ठपणा आणि कोलेस्टेरॉल कमी करण्यास देखील मदत करते. हिरव्या मिरच्यांमध्ये संत्र्यांपेक्षा जास्त व्हिटॅमिन सी असते. त्यामुळे त्वचा चमकदार होते आणि हाडे मजबूत होतात. लक्षात ठेवा की मिरच्या कापून जास्त काळ साठवल्याने त्यातील व्हिटॅमिन सी कमी होऊ शकते. हिरव्या मिरच्यांमध्ये असलेले व्हिटॅमिन के रक्त गोठण्यासाठी आणि हाडांच्या बळकटीसाठी आवश्यक आहे. हिरव्या मिरच्या खाण्याचे अनेक मार्ग आहेत. यामध्ये डाळ आणि रोटीसोबत कच्च्या मिरच्या, धणे-लसूण चटणी, मोहरीच्या तेलाचे लोणचे किंवा लिंबू-कांद्याचे कोशिंबीर यांचा समावेश आहे. जास्त हिरव्या मिरच्या खाल्ल्याने छातीत जळजळ आणि आम्लता होऊ शकते. अल्सर किंवा गॅसचा त्रास असलेल्यांनी त्या मर्यादित प्रमाणात खाव्यात.

## पाककला

### सुगंधी केशर पुलाव

**साहित्य :** बासमती तांदूळ- एक कप, पाणी- दोन कप, जिरे- एक टेबलस्पून, तूप- दोन टेबलस्पून, केसर, हिरवी वेलची, लवंग, दालचिनी - एक छोटा तुकडा, मनुका - दोन टेबलस्पून, काजू - दोन टेबलस्पून, मीठ चवीनुसार

**कृती :** कोथिंबीर सर्वात आधी बासमती तांदूळ पूर्णपणे स्वच्छ करा. तो २० मिनिटे स्वच्छ पाण्यात भिजवा. तांदळातील जास्तीचे पाणी काढून टाका. दोन टेबलस्पून कोमट दूध घ्या आणि त्यात केशर घाला. बाजूला ठेवा. एक पॅन गरम करा. तूप घाला आणि गरम करा. त्यात जिरे, वेलची, लवंग आणि दालचिनी घाला. त्यात लांबीने कापलेले काजू घाला. ते चांगले भाजून घ्या. मनुके देखील घाला. आता तांदूळ घाला आणि हलक्या हाताने मिक्स करा. त्यात दोन कप पाणी आणि मीठ घाला. केशर घाला आणि मिक्स करा आणि झाकून ठेवा. आता मंद आचेवर तांदूळ शिजवा. व जर त्यात पाणी असेल तर पाणी पूर्णपणे आटून होईपर्यंत आणखी काही वेळ शिजवा. शिजवल्यानंतर, गॅस बंद करा आणि पाच मिनिटे झाकून ठेवा. त्यावर कोथिंबीर गार्निश करा.

## वास्तू

### मीठ आणि झाडे

मीठ नकारात्मक ऊर्जा शोषून घेते असे मानले जाते. जेव्हा ते झाडांजवळ ठेवले जाते तेव्हा ते झाडांची सकारात्मक ऊर्जा आणि त्यांची वाढ रोखते. झाडे घरात ताजेपणा, हिरवळ आणि सकारात्मकता आणतात. अशा परिस्थितीत, जर झाडांमध्ये मीठ ओतले किंवा झाडांजवळ ठेवले तर ही सकारात्मक ऊर्जा नकारात्मकतेत बदलते आणि घरात आर्थिक संकट निर्माण करते.

## सौंदर्य

टोमॅटोचा गर, चिमूटभर हळद, अर्धा चमचा लिंबाचा रस आणि थोडे बेसन एकत्र करा. ही पेस्ट तासभर चेहऱ्याला लावल्याने चेहरा उजळतो.

## सल्ला

काचेची भांडी छान चकचकीत निघावी यासाठी पाण्यात लिंबाचा रस पिळा आणि लिंबाच्या सालीने भांडी स्वच्छ करा.

संकलक :
अॅड. सौ. पूजा गुंदेचा

# दैनिक पंचांग

रविवार, दि. १२ ऑक्टोबर २०२५

**---, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, आश्विन कृष्णपक्ष, मृग १३।३७, सूर्योदय ०६ वा. ३१ मि. सूर्यास्त ०५ वा. ३४ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** आपणास आकस्मि करीत्या इतर लोकांबरोबर चांगला काळ व्यतीत होईल.

**वृषभ :** एखाद्या कल्पक, सर्जनशील कार्यात गुंतलेले राहू शकता. प्रणयातही समस्या येण्याची शक्यता.

**मिथुन :** काळजीपूर्वक कार्य करा. कोणतेही कार्य एखाद्यावर विसंबून करू नका. जुन्या मित्र मंडळींची भेट होईल. सार्वजनिक प्रसंगांतून दिवस चिंतेचा.

**कर्क :** अपत्यांपासून आनंदप्राप्ती होईल. वाहनसुख मिळेल. उत्तम भोजनाचे सुख मिळेल. पितृचिंता सतावेल. आधी दिलेली उधारी उसनवारी मिळेल.

**सिंह :** भागीदारीच्या विषयांमध्ये सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे. वाहने जपून चालवावीत. एखादी नवीन वस्तू घेण्यास दिवस अनुकूल आहे.

**कन्या :** आपण आपल्या इच्छेनुसार कार्य करण्याचे प्रयत्न करता त्यावेळी त्रास होण्याची शक्यता आहे.

**तूळ :** परस्पर सहकार्याचे महत्त्व ओळखणे आपल्यासाठी उत्तम राहील.

**वृश्चिक :** आपल्या कौटुंबिक सभासदांच्या आरोग्याची काळजी घ्या. मागील चालू असलेली प्रकरणी सुरळीत होतील.

**धनु :** नव्या योजना आणि प्रोजेक्ट्स कार्यान्वित करणे आपल्यासाठी श्रेयस्कर ठरेल. हाती नवीन कामे घेण्यासाठी दिवस अत्यंत अनुकूल आहे.


**मकर :** एखादी चांगली संधी मिळाल्या मुळे आपली मनस्थिती चांगली राहील. मागील एखादे महत्त्वाचे काम मार्गी लागण्याची दाट शक्यता आहे.

**कुंभ :** गंभीरपणे विचार केलात तर एखादी बौद्धिक योजना आरंभ करू शकाल. मानसिक स्थिती अत्यंत प्रसन्न राहिल.

**मीन :** अधिकारी वर्गाच्या हातात अडकलेले कामे पूर्ण होतील. जुन्या मित्र-मैत्रिणींचा सहवास लाभेल.

**संकलक : अॅड. सौ. पूजा गुंदेचा**

## शब्दगंध क्र. ७२८२ सौ.शैलजा कुलकर्णी



शब्दगंध क्र. ७२८१ चे उत्तर



**आडवे शब्द :-** १) आराधना; पूजा ४) चकाकी; तेज; लकाकी ७) मनुष्य; माणूस ८) मोठेपणा; थोरवी ९) भांडण सोडविणारे त्रयस्थ मंडळ ११) हार; माळ; तुलना; बरोबरी १२) चलाख; हुशार; ताजातवाना १४) दुःखी; खिन्न १६) घराच्या मागची मोकळी जागा २०) पत्त्यातील एक डाव २१) एखाद्यास वश करून घ्यावयाचे मंत्र वगैरेचे प्रयोग २२) वाकलेला; झुकलेला २३) चेतना; जीव; पंचप्राणांपैकी एक

**उभे शब्द :-** १) उमा म्हणजे पार्वती आणि पार्वतीचा पती म्हणून शंकराचे असेही नाव आहे २) पर्ण; धोतरजोडीतील एक भाग ३) सूट; डिस्काउंट ४) एक लोकप्रिय पेय ५) मनसब धारण करणारा ६) एक अरबी देश ८) साह्य; सहकार्य १०) एखाद्या तीर्थक्षेत्राला ठराविक दिवशी नियमित जाणे १३) तप्त; तापलेले; रसरसशीत १५) वारा; वात; वेगाने वाहणारी हवा १६) वारा; वेगाने वाहणारी हवा; वात १७) पाढ्यातील सहाची संज्ञा १८) दरवाजा; कवाड ; द्वार १९) एक दिवंगत क्रिकेटपटू

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक :
अॅड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** कला म्हणजे परमेश्वराचे मंदिर आहे.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### पुरुष की महिला, कोणाला जास्त व्यायामाची गरज आहे?

आरोग्य आणि तंदुरुस्ती ही आजकालची केवळ ट्रेंड नाही तर एक गरज आहे. निरोगी शरीर आपल्याला आपल्या दैनंदिन जीवनात सक्रिय आणि उत्पादक ठेवते. पण अनेकदा प्रश्न पडतो: पुरुष की महिलांना जास्त व्यायामाची गरज आहे? हार्मोनल बदल आणि मासिक पाळीमुळे महिलांनी व्यायामावर अधिक लक्ष केंद्रित करावे का? की पुरुषांना स्नायूंच्या वस्तुमान आणि चरबी जाळण्याची जास्त गरज आहे? आपण पुरुष आणि महिलांच्या व्यायामाच्या गरजा का वेगळ्या असतात आणि कोणत्या परिस्थितीत कोणाला जास्त व्यायामाची आवश्यकता असते याचा तपशीलवार शोध घेऊ.

पुरुष आणि महिलांच्या शरीराच्या रचनेत आणि चयापचय दरात लक्षणीय फरक आहेत. पुरुषांमध्ये स्नायूंचे वस्तुमान जास्त असते, ज्यामुळे त्यांचे चयापचय गतिमान होते. दरम्यान, महिलांचे शरीर अधिक चरबी साठवते, विशेषतः कंबर आणि मांड्यांमध्ये. चरबी जाळण्यासाठी आणि हार्मोनल संतुलन राखण्यासाठी महिलांना अधिक नियमित व्यायामाची आवश्यकता असते. पुरुषांना स्नायूंचा टोन आणि कार्डिओ हेल्थ राखण्यासाठी देखील व्यायामाची आवश्यकता असते, परंतु महिलांसाठी ही गरज काहीशी जास्त मानली जाते.

(क्रमशः)

## लोभी शेतकरी

अनेक वर्षांपूर्वी एका गावात एक शेतकरी त्याच्या पत्नीसह एका राहत होता. त्यांच्याकडे एक लहानशी जमीन होती जिथे ते भाज्या पिकवत आणि बाजारात विकत. गावात एका तलावाजवळ एक मंदिर होते. गावकरी देवीला तलावाच्या काठावरील झाडांचे आंबे अर्पण करत होते. म्हणून, कोणालाही त्यांच्या स्वार्थासाठी झाडे आणि तलाव वापरण्याची परवानगी नव्हती.


एके दिवशी, शेतकरी मंदिराजवळून जात होता आणि त्याला झाडावर मोठ्या प्रमाणात रसाळ आंबे लटकलेले दिसले. त्याने आजूबाजूला पाहिले आणि लक्षात आले की जवळपास कोणीही नाही. या संधीचा फायदा घेत त्याने झाडावरून एक आंबा तोडला आणि तो तलावाच्या काठावर गेला. तलावात प्रवेश करताच त्याला अनेक मासे पोहताना दिसले. उत्साहित शेतकऱ्याने तलावातून अर्धा डझन मासे पकडले आणि आनंदाने घरी परतला.

घरी पोहोचल्यानंतर, त्याने ताबडतोब मासे त्याच्या पत्नीला दिले आणि तिला स्वादिष्ट जेवण बनवण्यास सांगितले. पण जेव्हा त्याच्या पत्नीने पहिला घास खाल्ला तेव्हा ती लगेच बेशुद्ध पडली. ती बेशुद्ध पडताच मागून एक आवाज आला. त्या आवाजाने शेतकऱ्याला सांगितले की त्याला त्याच्या लोभाची शिक्षा मिळाली आहे. शेतकऱ्याने त्याच्या चुकीबद्दल माफी मागितली आणि आपल्या पत्नीला वाचवण्याची विनंती केली.

त्या आवाजाने शेतकऱ्याला मासे शिजवण्यासाठी वापरलेली सर्व भांडी त्याच सरोवर तलावात टाकण्याचा आदेश दिला. त्याने तसे केले आणि अशा प्रकारे त्याच्या पत्नी पुन्हा शुद्धीवर आली व त्याला त्याने केलेल्या कृत्याचा पश्चाताप झाला.

तात्पर्य : कधीही चोरी करू नये आणि नेहमी धार्मिक मार्गाचे अनुसरण करावे.

## जीवन का अमृत (भाग १)



### गुरू और परमात्मा

जैसे कि आगे कथा है राजा पीपा ने अपना राज-पाट छोड़ दिया और वे फिर से संत रामानन्द जी के पास पहुँचे संत रामानन्द जी ने उन्हें कहा कि आप इस कुएं में छलांग लगा दो। संत रामानन्द जी देखना चाहते थे कि कितनी दृढ़ता से वे प्रभु को पाना चाहते हैं। राजा पीपा कुएं के पास गए और छलांग लगाने लगे. तो कुछ शिष्यों ने उन्हें पकड़ लिया और यही बताया जाता है कि उसके बाद इनकी तरक्की रूहानियत के रास्ते पर होने लगी। इस शब्द में राजा पीपा अपनी जिंदगी के अनुभवों की बातचीत कर रहे हैं। वे हमें यही समझा रहे हैं कि जिस प्रकार बिजली की शक्ति है, यदि बिजली न हो तो लाउडस्पीकर काम नहीं करेंगे, बिजली नहीं होगी तो हमारे घरों में भी रोशनी नहीं होगी। इसी प्रकार हमारे शरीर के पीछे कोई सत्ता काम कर रही है. वह सत्ता जो किसी बिजली-घर से आ रही है। वह बिजली-घर क्या है? वह परमात्मा है, कर्तापुरुख है जिसने सारी सृष्टि को रचा है। (क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

### आज्ञा चक्र

रुडाल्फ स्टायनर नाम के वैज्ञानिक ने जैव ऊर्जा खेती पद्धति में स्पष्ट कहा है कि सेन्द्रिय खेती पद्धति में जमीन को शक्तिशाली बनाने के लिये ब्रह्माण्ड की ऊर्जा बहुत आवश्यक है।

उत्तराखण्ड में जी.बी.पंत यूनिवर्सिटी ऑफ एग्रीकल्चर टेक्नोलॉजी, पंतनगर कृषि विद्यापीठ में और सरदार कृषिनगर, दांतीवाड़ा, एग्रीकल्चरल युनिवर्सिटी, गुजरात में बीज को योगदान पद्धति से चार्ज किया तो बीज की अंकुरण क्षमता ८% बढ़ गई।लाखोव्हस्की नाम के वैज्ञानिक ने सिद्ध किया है कि वनस्पतियों को वैश्विक शक्ति (ब्रह्माण्ड की शक्ति) से चार्ज करने से पौधों का विकास, रोगप्रतिकार क्षमता और उत्पादन क्षमता बढ़ती है।

प्रत्यक्ष रूप में कई किसान राजयोग के प्रयोग से अपनी फसल की प्राकृतिक आपदाओं से, जंगली प्राणी, पंछियों से रक्षा करने में सफल हुए हैं।

इस विधि से सिद्धि प्राप्त करने के लिये राजयोग सीखना जरूरी है, जो ब्रह्माकुमारीज़ के सेवाकेन्द्रों पर नि:शुल्क सिखाया जाता है।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

धर्मेंद्रच्या घरी एक चोर चोरी करत असतो
धर्मेंद्र : कमीने!
चोर : हो रे बाबा, कमीच नेतोय

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* भारताचे संरक्षणमंत्री कोण आहेत?

– राजनाथसिंह

– **अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## साहित्य सहवास – 'लव्ह यू बीग बी...'

बीग बी... आपल्या सगळ्यांचा अभिता बच्चन, अमिताभ आज ८४ व्या वर्षात पदार्पण करत आहेत. अलाहाबादचा एक सामान्य तरुण. नशिब आजमावण्यासाठी हिंदी चित्रपटात भुमिका मिळावी ह्यासाठी अथक परिश्रम करतो. अनेक निर्माते, दिग्दर्शकांना विनंती करतो. संघर्षमय जीवन. अशावेळी अमिताभ, वडिल हरिवंशराय बच्चन ह्यांना विचारतात 'बाबुजी, मुझे कब तक संघर्ष करना पडेगा ?' बाबुजी उत्तर देतात, 'जब तक जीवन है तब तक संघर्ष आहे.' आपल्या अभिता बच्चनचा आवाज आकाशवाणीने नाकारला. पण बच्चनसाहेब खचले नाहीत. अत्यंत मेहनतीने आवाज कमावला. आज त्यांच्या सारखा आवाज काढण्याचा प्रयत्न अनेकजण करतात. १९८२ साली कुली चित्रपटाच्या शुटिंग दरम्यान बच्चन साहेबांना अपघात झाला.

जीवन-मरणाच्या सीमारेषेवर असतांना अमिताभजींच्या लाखो चाहत्यांनी ब्रीच कॅण्डी हॉस्पीटलबाहेर (मुंबई) तसेच अनेक घरांमध्ये, त्यांचा जीव वाचुन ते पुन्हा पडद्यावर दिसावेत म्हणून प्रार्थना केली गेली, हनुमान चालिसा वाचले गेले. ह्या जीवघेण्या प्रसंगावर अमिताभने मात केली. स्वतःला सिध्द केलं ते 'जंजीर' चित्रपटातुन. अँग्री यंग मॅन ही इमेज निर्माण करण्यात ते यशस्वी झाले. साधारण चाळीस वर्षांपूर्वी मोठ्या पडद्यावर अमिताभची एंट्री झाली की थिएटर टाळ्या, शिट्ट्यांनी दणाणुन जायचं... अँग्री यंग मॅन, अन्यायाच्या विरोधात लढणारा मोठ्या पडद्यावर आला की आता खुप काही चांगलं असं मिळणार, करमणुक होणार, चांगला संदेश मिळणार हे असं व्हायचंच. अमिताभ ह्यांना एका मुलाखतीमध्ये प्रश्न विचारला, 'तुमच्या दृष्टीने चित्रपटात सगळ्यात महत्वाचं काय?' ते उत्तरले 'त्या चित्रपटाची कथा हाच त्या चित्रपटाचा खरा हिरो.' त्यांना पाहून अनेक चित्रपट लिहिले गेले अगदी आजही त्यांच्या वयाच्या ८४ व्या वर्षीही लिहिले जाताहेत हे भाग्य खचितच एखाद्या अभिनेत्याच्या वाट्याला आलं असेल.

अमिताभ ह्यांच्या विषयीची मी वाचलेली पुस्तकं, मुलाखती, ह्यांमधुन माझ्या लक्षात आलं की अमिताभ दिलेली वेळ अगदी शंभर टक्के पाळणारंच. दिलेली वेळ पाळण्यासाठी ते ट्रॅफिक जाममध्ये काहीवेळ अडकले असतांना, चित्रीकरण स्थळी ते अक्षरशः पायी, कधी लिफ्ट मागुन तर कधी पळत जाऊन कॉल टाईमला पोहचले आहेत, अगदी आजही दिलेल्या वेळेपूर्वी, पोहचतात आणि सर्वात महत्वाचं म्हणजे अस्खलित हिंदी बोलणं. हिन्दी भाषेवरचं त्यांचं प्रेम, प्रभुत्व अनुकरणीय, कौतुकास्पद आहे. त्यांच्या वयाच्या साठाव्यावर्षी 'अमिताभ बच्चन कॉर्पोरेशन लिमिटेड' ह्या काढलेल्या कंपनीमुळे ते अक्षरशः रस्त्यावर आले. जवळचे सगळे पैसे संपले.

ऐकिव माहितीनुसार त्यांच्यावर थोडं कर्जही झालं. असं म्हणतात आपलं पुर्व कर्म आपल्याला नक्कीच कामाला येतं. २००० साली 'कौन बनेगा करोडपती' हा छोट्या पडद्यावरचा कार्यक्रम सुरु झाला. अमिताभजी सुत्रसंचालक, प्रश्न विचारणारे म्हणून बसले आणि रात्री ९ वाजेनंतर रस्ते निर्मनुष्य होऊ लागले. अमिताभच्या आवाजाचा, प्रसंगौचित्याचे कौतुक प्रेक्षक करु लागले. खरं तर अमिताभ, माझे ना नातेवाईक, ना परिचित, ना मित्र. पण आजही ते कोट्यावधी व्यक्तींचे प्रेरणास्थान आहेत. दिलेल्या वेळेवर पोहचण्याचा त्यांचा गुण मी घेतला आहे.

खरंतर एखाद्या व्यक्तीला आपण भेटु शकतो पण त्यांचे चित्रपट, केबीसी कार्यक्रम, त्यांच्या मुलाखती पाहुन, वाचुन आपल्यात जिगर निर्माण होतेच. अमिताभजींचे अनेक चित्रपट पाहिलेत. अमिताभ होण्याचा प्रयत्न का करु नये ? अभिनयातल्या अमिताभ आपण होऊ शकणार नाही पण दैनंदिन जीवनातला अन्यायाच्या विरोधातला हिरो अमिताभ होऊ शकतो. आपण जे क्षेत्र निवडलं अथवा जे क्षेत्र, काम आपल्या वाट्याला आलं त्यातला अमिताभ होणारंच हा सकारात्मक विचारच आपल्याला सुखी, समाधानी, आनंदी, यशस्वी करणारंच आहे. मी साहित्यातला, लघुचित्रपट लेखनातला अमिताभ होण्याचा प्रयत्न जाणीवपूर्वक मनापासून करतो आहे, केलाच पाहिजे. अमिताभ प्रत्येकात आहेच फक्त त्या बीग बीचा शोध आपण घ्यायलाच पाहिजे. बीग बी, तुम्ही '१०२ नॉट आऊट' व्हा वाढदिवसानिमित्ताने ह्या मनापासून शुभेच्छा. लव्ह यु बीग बी. (लेख क्र.५७०)

**– सुनील राऊत**
माळीगल्ली, भिंगार, अहिल्यानगर
मो.९८२२७५८३८३

# आरोग्य सखी

### आयुर्वेदीय आहार दृष्टीकोन

त्यामुळे पुढील आयुष्यात निर्माण होणारे धोके समजतात व त्यावर वेळीच उपाय करता येईल किंवा न येईल याबद्दलचे मार्गदर्शन डॉक्टरांकडून मिळते. अर्थातच फसवणूक थांबवता येऊ शकते. विवाहापूर्वी वधू आणि वर या दोघांच्याही वैद्यकीय तपासण्या करून घेणं आजच्या काळाची गरज आहे.

प्रत्येक विवाहेच्छुक मुलीच्या मनामध्ये पतीबद्दलची प्रतिमा बनलेली असते. ती स्वप्नामध्ये भावी पतीबद्दल विचारही करते. त्यात चुकीचे काहीच नाही. परंतु स्वप्न सत्यात उतरणे फार कठीण असते. त्यामुळे स्वप्न आणि प्रत्यक्ष जीवन यांचा ताळमेळ बसवणे जमले पाहिजे. याकरिता घरातील मोठ्या स्त्रियांनी स्वप्नातला राजकुमार व प्रत्यक्ष जोडीदार व इतर जबाबदाऱ्या यांची जाणीव करून द्यायला हवी. त्यामुळे आज वैवाहिक जीवनात निर्माण झालेली विफलता, नैराश्य आणि भांडणांचे प्रमाण कमी होईल. विवाह नातेसंबंधांमध्ये करू नये. बऱ्याच घराण्यांमध्ये आपली संपत्ती दुसऱ्या घरातील स्त्रीला मिळू नये, म्हणून पिढ्यान्पिढ्या आपल्याच नात्यातील मुलीला सून करतात.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर
मोबाईल नं- ८७९३४००४००

# भारताने केवळ महासत्ता न होता विश्वगुरू, विश्वमित्र होण्यासाठी हा कालखंड महत्त्वाचा

### ऑर्गनायझरचे प्रफुल्ल केतकर यांचे प्रतिपादन; पंडित दीनदयाळ व्याख्यानमालेला प्रतिसाद


पंडित दीनदयाळ व्याख्यानमालेचे 'जगाचे बदलते रूपाने भारताचा वाटा' या विषयावर दुसरे पुष्प गुंफताना प्रफुल्ल केतकर

नगर – भारताची अर्थव्यवस्था जलदगतीने अकराव्या स्थानावरून, चौथ्या स्थानावर आली आहे. भारतातील सर्व बँक व्यवहार यूपीआय प्रगत तंत्रज्ञानाच्या मार्फत होत असल्याने परदेशातील पेमेंट करण्यासाठी आता डॉलरची गरज भासणार नाही. कोरोना महामारीच्या काळात १०८ देशांना व्हॅक्सिनचा पुरवठा भारताने केला होता. या देशावर साडेतीनशे वर्षात ब्रिटिश यांच्यासारखी १७ परकिय आक्रमणे झाली. तरी भारताने आपली संस्कृती नष्ट होऊ दिली नाही. संत ज्ञानेश्वर यांच्या आता विश्वात्मके देवेया अभंगाप्रमाणे विश्व हे कुटुंब आहे. हे समजून भारताची वाटचाल सुरू आहे. भारताचे वैश्विक मिशन या संदर्भात १९६५ साली संघाचे द्वितीय सरसंघचालक माधव सदाशिव गोडवलकर गुरुजी यांनी स्वयंसेवकांना दिलेल्या पत्रात असे नमूद केले की, संपुर्ण विश्वाला धर्माच्या आधारावर व्यक्ती आणि समूह, मानव आणि पर्यावरण, विज्ञान आणि अध्यात्म याचे संतुलन साधणारा धर्म शिकविणे हे भारताचे जीवीत कर्तव्य आहे. ते पार पाडण्यासाठी आपण तयार आहोत की नाही?. या प्रक्रियेतून जात असताना अनेक उलथापालथी झालेले आहेत. यासाठी सरकार पुरेसे नाही, सैन्य पुरेसे नाही. सर्व सामान्य नागरिकांना एक सैनिक म्हणून काम करावे लागेल. भारताकडून शेजारील राष्ट्रांना असलेली अपेक्षा लक्षात घेऊन भारताने एक प्रकारे केवळ महासत्ता न होता विश्वगुरू, विश्वमित्र होण्यासाठी हा कालखंड महत्त्वाचा आहे. भारत हा जागतिक व्यवस्था बदलणारा नाही तर भारताची जागतिक व्यवस्थेत काय भूमिका असेल? नवीन व्यवस्था बदलण्यासाठी आपण काय योगदान देणार आहोत? हा प्रश्न स्वतःला विचारायला पाहिजे. पंडित दीनदयाळ यांनी सांगितल्याप्रमाणे चिती म्हणजे राष्ट्राचा आत्मा आहे. राष्ट्राचा आत्मा हा ठीक असेल तर देशाची प्रगती होते. चिती च्या आधारावर देश उभा राहिला तर जगाला त्याचे विराट दर्शन होईल ते विराट दर्शन जगाला देण्यासाठी व भारतमातेला सिद्ध होण्यासाठी योगदान देण्याची सिद्धता आपल्यामध्ये यावी, असे प्रतिपादन नवी दिल्ली येथील ऑर्गनायझर मासिकाचे मुख्य संपादक प्रफुल्ल केतकर यांनी केले आहे.

सावेडी येथील माऊली सभागृहात पंडित दीनदयाळ पतसंस्था व पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठानच्या वतीने पंडित दीनदयाळ व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. या व्याख्यानमालेच्या जगाचे बदलते रूपाने भारताचा वाटा या विषयावर वक्ते प्रफुल्ल केतकर यांनी दुसरे पुष्प गुंफले. याप्रसंगी प्रमुख उपस्थितीत केरळचे राज्यपाल राजेंद्र आर्लेकर, भाजपाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष श्याम जाजू, रा.स्व.संघाचे प्रांत संघचालक नानासाहेब जाधव, पंडित दीनदयाळ पतसंस्थेचे संस्थापक चेअरमन वसंत लोढा, उद्योजक मोहनलाल मानधना, अभय आगरकर, भानुदास बेरड, डॉ.प्रकाश कांकरिया, सुधाताई कांकरिया, बाबु टायरवाले, अनंत देसाई, मानद सचिव विकास पाथरकर, ज्येष्ठ संचालक मिलिंद गंधे, संचालक निलेश लोढा, बाबासाहेब साठे, श्रीमती शैला चंगेडे, सौ.शारदा होशींग, दीनदयाळ परिवार प्रतिष्ठानचे अध्यक्ष धनंजय तागडे, महासचिव बाळासाहेब भुजबळ, कार्याध्यक्ष सुरज अग्रवाल, उपाध्यक्ष अशोक कानडे, अनुराग धूत, विश्वस्त संदेश लोढा, मनीष सोमानी, अनिरुद्ध देवचक्के, राजकुमार जोशी, सहसचिव राहुल जामगावकर, कोषाध्यक्ष सुखदेव दरेकर, केके शेट्टी, अजित कृष्णन, सुनील पंडित, अनिल जोशी, उमेश बोरा, किशोर जोशी, रणजीत परदेशी, किशोर गांधी, महावीर कांकरिया, संग्राम म्हस्के, नरेंद्र श्रोत्री, शामराव वागस्कर, निलेश चिपाडे, सचिन पळशीकर आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना केतकर म्हणाले, भारतीय सैन्याने केलेल्या ऑपरेशन सिंदूर या कारवाईचा धक्का पाकिस्तान पेक्षा अमेरिकेला मोठ्या प्रमाणात बसला आहे. अमेरिकेची अर्थव्यवस्था दिवसेंदिवस ढासळत आहे. अमेरिकेत १०० डॉलरच्या उत्पन्नामध्ये १३३ डॉलरचे कर्ज आहे. अमेरिकेत भातर घंटेचे शटडाऊन करण्यात आले होते. सोळा ते सतरा वर्षाची पाचवी घटना आहे. अमेरिकेतील संपूर्ण व्यवहार पूर्णपणे ठप्प झाले होते. तसेच चीनची लोकसंख्येत ६० टक्के लोकसंख्या १८ ते ६० या वयोगटाची आहे. ही चिंताजनक बाब आहे. तसेच पूर्वी लोकसंख्या विस्फोट अशी भारताची चर्चा होती. आज भारताची लोकसंख्या ही तरुणांची मोठी शक्ती निर्माण झाली आहे. देशातील तरुणाई नवनवीन तंत्रज्ञान व कौशल्य अवगत करत आहे.

प्रास्ताविकात वसंत लोढा म्हणाले, पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या विचाराने प्रभावित होऊन पंडित दीनदयाळ व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात येत आहे. सामर्थ्य अनियंत्रित बेधुंद वर्तनात नाही, शुद्ध विचाराने नियंत्रित केलेल्या कृतीत असते. धगधगत्या राष्ट्रप्रेमी भावनांना अखंड चेतविणारं, शब्द बाणांनी सुसज्ज क्रांतिकारी ऑपरेशन सिंदूर अर्थातच पंडित दीनदयाळ व्याख्यानमाला आहे. या व्यासपीठावरून अनेक दिग्गज नामवंत लेखक, वक्ते, साहित्यिक, राजकीय मंडळी यांनी देशातील सामाजिक परिस्थिती, राजकीय जडणघडण राष्ट्रभक्ती, देशभक्ती, तसेच देशातील विविध समस्या यावर विचार व्यक्त केले आहेत. या माध्यमातून समाजाचे प्रबोधन होत आहे.

या व्याख्यानमालेचे सूत्रसंचालन शारदा होशिंग यांनी केले. राहुल जामगावकर यांनी आभार मानले.

# बीनाका गीतमाला गीतांच्या महफिलचे नगरमध्ये १२ ऑक्टोबरला आयोजन



नगर – नगरच्या रसिकांसाठी जुन्या नव्या गीतांची मैफल पुन्हा एकदा संगीताचा जल्लोष घेऊन येत आहे बीनाका गीतमाला भाग १३ हा बहुचर्चित कार्यक्रम गायक व कलावंत जावेद मास्टर यांच्या प्रस्तुतीत हा संगीतमय सोहळा १२ ऑक्टोबर रोजी सायं. ६ वाजता रहमत सुलतान हॉल, सर्जेपुरा, नगर येथे पार पडणार आहे. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून कवयित्री डॉ. कमर सुरुर उपस्थित राहणार आहेत.

या कार्यक्रमात गायक व कलावंतांचा सुरेल मेळा रसिकांना अनुभवायला मिळणार आहे. त्यात सुनील भंडारी, डॉ. ललित गोर्डे, मनोजकुमार, अन्सार शेख, सुनील रोझमॅन, लांडगो सर, मोहसिन सैफी, अन्वर शेख, चारु ससाणे, असलम कुमार, राजेंद्र शहाणे, इकबाल बागवान, संजय भिंगारदिवे, विद्या तन्वर, वैशाली नराल यांच्यासह जावेद मास्टर स्वत गायन सादर करणार आहेत.

याचे सूत्रसंचालन आबिद खान करणार असून, विविध गीतांच्या माध्यमातून जुन्या आणि नव्या सुरांचा संगम रसिकांना मंत्रमुग्ध करणार आहे.

आयोजकांनी रसिकांना आवाहन केले आहे की, कार्यक्रम वेळेवर सुरू होईल म्हणून सर्वांनी वेळेवर उपस्थित रहावे आणि आपल्या आवडत्या गायकांच्या सुरेल सादरीकरणाचा आस्वाद घ्यावा असे आवाहन जावेद मास्टर यांनी केले आहे.

# आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये १४ ऑक्टोबरला 'स्त्रीरोग मोफत तपासणी शिबिराचे' आयोजन



नगर – जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे १४ ऑक्टोबर रोजी स्त्रीरोग मोफत तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी गर्भवती माता आरोग्य तपासणी व उपचार मार्गदर्शन केले जाणार आहे. स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ.सोनल बोरुडे व डॉ.कृतिका पाटील शिबिरात रूग्ण तपासणी करणार आहेत.

या शिबिरात दुर्बिणीव्दारे कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया, गर्भाशयाची पिशवी काढण्याची शस्त्रक्रिया प्रत्येकी १० हजार रुपये, सिझेरियन १० हजार रुपयांत केले जाईल. शिबिरात सहभागी होणाऱ्या गर्भवती मातांना सोनाग्राफी, रक्त, लघवी इ. तपासण्या ५० टक्के सवलतीच्या दरात केल्या जातील. शिबिरापासून पुढील १ महिन्यापर्यंत या सवलतीचा लाभ घेता येणार आहे. तसेच शिबिरात सहभागी होणाऱ्या मातांना बाळंतपणावेळी बिलामध्ये ५० टक्के सवलत दिली जाईल. यासाठी सवलतीच्या कार्ड असणे आवश्यक आहे.

आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये डिजिटल एक्स रे २५० रुपये, सोनोग्राफी कलर प्रिंट व रिपोर्टसह ८०० रुपये, सिटीस्कॅन १२५० रुपये, एम.आर.आय.२५०० रुपयात उपलब्ध आहे. हॉस्पिटलमध्ये हायटेक पॅथोलॉजी लॅब व ३५ अत्याधुनिक डायलेसिस मशीनव्दारे सेवा उपलब्ध आहे. आनंदऋषीजी ब्लड बँक सेवाही २४ तास उपलब्ध आहे. या शिबिराचा जास्तीत जास्त महिला रूग्णांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जैन सोशल फेडरेशनच्यावतीने करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी संपर्क – ०२४१–२३२०४७३/७४/७५/७६.

# होमिओपॅथीक मेडिकल कॉलेजमध्ये १३ ते १८ ऑक्टोबरपर्यंत 'संधीवात' तपासणी व उपचार शिबीर

नगर – अहमदनगर होमिओपॅथीक शिक्षण संस्थेचे अहमदनगर होमिओपॅथीक मेडिकल कॉलेज व हॉस्पिटल सावेडी रोड, अहमदनगर येथे १० ऑक्टोबर (Mentel Health Day) आणि १२ आक्टोबर (Arthritis Day) निमित्त १३ ते १८ ऑक्टोबर पर्यत सकाळी ९.३० ते ५ या वेळेत संधीवात या विकारांवर मोफत तपासणी व उपचार शिबीराचे आयोजन केले असल्याची माहिती प्राचार्य व रुग्णालयीन अधिक्षक डॉ. सुनिल पवार यांनी दिली.

सदर शिबीरामध्ये संधीवात या विकारांवर सखोल चिकित्सा करुन आजार बरा होईपर्यंत दर आठ दिवसाला मोफत औषधे दिली जातील.

शिबीरातंर्गत सर्व रुग्णांची मोफत तपासणी प्राचार्य डॉ. सुनिल पवार, डॉ. कैलास परदेशी, हे करणार असुन आजार बरा होईपर्यत सर्वाना मोफत होमिओपॅथीक औषधे देण्यात येतील. तसेच गरजेनुसार ईसीजी, रक्त, लघवी व सोनोग्राफी व एक्स रे ची तपासणी करून, या तपासण्यांवर ३० टक्के सवलत दिली जाईल. तरी अहमदनगर व अहमदनगर परिसरातील सर्व गरजु व्यक्तींनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष डॉ. भुषण अनभुले, उपाध्यक्ष भुषण चंगेडे, खजिनदार डॉ. विलास बी सोनवणे, सचिव डॉ. डी. एस. पवार, सहसचिव लक्ष्मीनिवास सारडा, संचालक बोरा आर.एस., अभय मुथ्था, शिवाजी रणसिंग, डॉ. समीर होळकर, राजेंद्र मेहेत्रे, डॉ. ऋतुजा चव्हाण व कृष्णा क्षत्रिय तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनिल पवार यांनी केले आहे.


आयएमएस सीडसी संस्थेतर्फे दीवाळी शॉपिंग फेस्टिव्हल २०२५ उद्घाटन करताना श्वेता गांधी.

# छोट्या उद्योगातून केलेली सुरुवात एक दिवस मोठा उद्योजक बनवेल

### कोहिनूर मॉलच्या श्वेता गांधी यांचे प्रतिपादन

नगर – महिलांमध्ये असणारी नाविन्यता लक्षात घेता त्यांनी सुरु केलेल्या छोट्या उद्योगातुनच मोठे उद्योजक तयार होतील, असे प्रतिपादन कोहिनूर मॉलच्या संचालिका सौ. श्वेता गांधी यांनी केले.

दिवाळी सणाच्या निमित्ताने आयएमएस सीडसी संस्थेच्यावतीने दीवाळी शॉपिंग फेस्टिव्हल २०२५ उद्घाटन गांधी यांच्या हस्ते झाले. यावेळी संस्थेचे संचालक डॉ. एम बी मेहता, उपसंचालक डॉ. विक्रम बार्नबस, सीड सी च्या समन्वयक डॉ. ऋचा तांदूळवाडकर, प्रा. गौरी पाटील व महिला उद्योजिका उपस्थित होते.

संस्थेच्या वतीने ११ व १२ ऑक्टोबर रोजी सावेडीतील कोहिनूर मंगल कार्यालय येथे आपल्या दिवाळी सणासाठी आवश्यक अशी सर्व उत्पादने विक्रीसाठी ठेवण्यात आलेली आहेत. गांधी यांनी यावेळी अनेक महिला उद्योजकांची उदाहरणे देऊन महिला उद्योजिकांना प्रोत्साहित केले. आपले प्रयत्न असेच सुरु ठेवा एक दिवस तुमचा असेल.

या शॉपिंग फेस्टिव्हलमध्ये दागिने, क्सेसरीज, दिवाळी डेकोरेशन आयटम्स, कपडे, मसाले, बॅग्ज, हर्बल प्रॉडक्टस, हॅण्डमेड साबण, बेकरी आयटम्स, स्वादिष्ट फूड अशा विविध उत्पादनांचे स्टॉल्स आहेत. दिवाळीची सर्व खरेदी या प्रदर्शनामुळे एकाच छताखाली करता येईल.

फेस्टिव्हीलमध्ये दर दोन तासांनी लकी ड्रॉ काढण्यात येणार आहे. त्यामुळे ग्राहकांना मनपसंत खरेदीबरोबरच आकर्षक भेटवस्तू जिंकण्याचीही संधी मिळणार आहे. महिला उद्योजिकांच्या या दर्जेदार उत्पादने विक्री प्रदर्शनाला भेट देण्याचे आवाहन संस्थेचे उपसंचालक डॉ. विक्रम बार्नबस यांनी केले आहे

# लक्ष्मण हाके यांच्या वाहनावर हल्ला प्रकरणातील तिघांना जामीन मंजूर

नगर – ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांच्या वाहनावर हल्ला केल्याप्रकरणी मराठा क्रांती मोर्चाचे समन्वयक गोरख दळवी यांच्यासह तिघांना शुक्रवारी जामीन मंजूर करण्यात आला. त्यांनी हाके यांच्या वाहनावर हल्ला केला होता. याप्रकरणी त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल होऊन अटक करण्यात आली होती. लक्ष्मण हाके अहिल्यानगरमधून सभेला जात असताना त्यांच्या वाहनावर मराठा क्रांती मोर्चाचे समन्वयक गोरख दळवी यांच्यासह संभाजी सप्रे आणि गणेश होळकर या तिघांनी हल्ला केला होता. नगर तालुका पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत हल्लेखोरांना ताब्यात घेतले. त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली होती. त्यांना न्यायालयाने जामीन मंजूर केला. त्यांच्या वतीने ॲड. महेश तवले, योगेश नेमाणे यांनी काम पाहिले.

त्यांना ॲड. संजय वाल्हेकर, ॲड. महेश शेडाळे आणि ॲड. अनुराधा येवले यांनी सहाय्य केले.

# सिद्धी पॅरामेडीकलच्या उज्वल निकालाची परंपरा कायम

### लकडे बिरू ७७.४३%, झेंडे बालकृष्ण ७७.१४% आणि कासार आकाश





नगर – सिद्धी पॅरामेडीकल इन्स्टिट्युट, अहिल्यानगर येथे जून २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या एक वर्ष कोर्सच्या परीक्षेचा उत्कृष्ट निकाल लागला. सिद्धी पॅरामेडीकल येथे महाराष्ट्र शासन मान्यताप्राप्त डी एम एल टी व रेडिओलॉजी टेक्निशियन हे पॅरामेडीकल कोर्सेस चालवले जातात. रेडिओलॉजी टेक्निशियन या कोर्समध्ये प्रथम क्रमांक लकडे बिरू ७७.४३%, दुसरा क्रमांक झेंडे बालकृष्ण ७७.१४% आणि तिसरा क्रमांक कासार आकाश ७५.२९% यांनी मिळवला आहे.

सिद्धी पॅरामेडिकल इन्स्टिट्युटच्या वतीने प्रिया मेहेत्रे तसेच अश्विनी नलगे यांनी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# भारतातील बाललैंगिक गुणोत्तर; १००० मुलांमागे फक्त ९२९ मुली

दरवर्षी ११ ऑक्टोबर हा दिवस आंतरराष्ट्रीय बालिका दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवसाचे मुख्य उद्दिष्ट मुलींच्या हक्कांबद्दल जागरूकता निर्माण करणे, त्यांना शिक्षण, आरोग्य आणि सुरक्षितता यासारख्या मूलभूत सुविधांचा लाभ मिळवून देणे आणि समाजातील लिंगसमानतेची स्थिती सुधारण्याकडे लोकांचे लक्ष वेधणे हे आहे. मात्र, या उत्सवाच्या पार्श्वभूमीवर भारतातील मुलींच्या जन्माला येणाऱ्या संख्येतील गंभीर असमानता चिंतेचा विषय ठरते. राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण (NFHS-5, 2019-21) नुसार भारतात जन्मावेळी लिंग गुणोत्तर, म्हणजेच प्रत्येक १,००० मुलांमागे जन्मलेल्या मुलींची संख्या फक्त ९२९ इतकी आहे. ही संख्या नैसर्गिक गर्भलिंग गुणोत्तराच्या (९५२ मुली प्रति १,००० मुले) तुलनेत खूपच कमी आहे. ही विकृती फक्त आकडेवारीवर आधारित समस्या नाही, तर समाजातील मुलींबाबत असलेले मानसिक, सामाजिक आणि सांस्कृतिक भेद स्पष्ट करते.

नैसर्गिक गर्भलिंग गुणोत्तर साधारणतः ९५२ मुली प्रति १,००० मुले असते, हे नैसर्गिक प्रक्रिया आणि जैविक घटकांच्या परिणामस्वरूप तयार होते. मात्र भारतातील मुलींच्या जन्मातील घट ही समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून गंभीर समस्या आहे. मुलींच्या जन्माला येणाऱ्या संख्येत घट हा लिंगभेद, सामाजिक अपेक्षा, मुलींबाबतच्या आर्थिक आणि सांस्कृतिक दृष्टिकोनाशी निगडीत आहे. काही भागांत मुलींचे जीवन कमी महत्त्वाचे मानले जाते, मुलींचे शिक्षण, आरोग्य आणि पोषण यामध्ये पुरुषांच्या तुलनेत कमी गुंतवणूक केली जाते, त्यामुळे मुलींचा दर्जा सामाजिकदृष्ट्या कमी होतो.

भारतामध्ये मुलींच्या जन्माला येण्याच्या संख्येतील घटाचे कारण बहुप्रकारे आहे. सर्वप्रथम, लिंग निवडीच्या प्रथांचा विचार करता येतो. गर्भधारणेदरम्यान मुलींचे लिंग ठरवून, गर्भपात करून किंवा मुलींचा जन्म टाळण्याच्या प्रथांमुळे जन्मावेळी मुलींच्या संख्येत घट होते. लिंग निवडीच्या प्रथा, ज्या मुलींचा जन्म टाळण्यासाठी किंवा गर्भावस्थेत लिंग ठरवून गर्भपात करण्यासाठी केल्या जातात, या समस्येचे मूळ कारण आहेत. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून गर्भातील लिंग ठरवणे, मग ते अवैध असले तरी, काही भागांत अजूनही चालू आहे. या प्रथेमुळे फक्त मुलींच्या जन्माला येण्याच्या संख्येत घट होत नाही, तर समाजात मुलींबाबतचा दृष्टिकोन, त्यांच्या मूल्याची कल्पना आणि लिंगसमानतेची स्थितीही ढासळते. मुलींचा जन्म सामाजिक आव्हान मानला जातो, कधी आर्थिक भार म्हणून, तर कधी सामाजिक मर्यादा आणि सांस्कृतिक रूढींच्या आधारे कमी महत्त्वाचा मानला जातो. ही प्रथा केवळ भारतापुरती मर्यादित नसून, काही अन्य आशियाई देशांमध्येही दिसून येते, मात्र भारतात तिचा सामाजिक आणि सांस्कृतिक प्रभाव विशेष स्पष्ट आहे. मुलींच्या जन्मावर असलेला आर्थिक आणि सामाजिक दबाव देखील यामागे मुख्य कारण आहे. लग्नाचा खर्च, मुलींच्या शिक्षणाचा भार, आणि मुलींच्या भविष्याबाबत असलेली सुरक्षिततेची चिंता यामुळे अनेक कुटुंब मुलींच्या जन्माला प्राधान्य देत नाहीत. या मानसिकतेत बदल करणे आणि मुलींचे मूल्य उंचावणे हे समाजाच्या प्रत्येक घटकावर अवलंबून आहे.

भारत सरकारने या समस्येवर नियंत्रण ठेवण्यासाठी कायदेशीर उपाययोजना उपाययोजना राबविल्या आहेत. Pre-Conception and Pre-Natal Diagnostic Techniques (PCPNDT) Act, १९९४ ह्या कायद्याद्वारे गर्भावस्थेत लिंग निर्धारणावर पूर्ण बंदी घालण्यात आली आहे. हा कायदा मुलींच्या जन्माला येणाऱ्या संख्येतील असमानतेवर नियंत्रण ठेवण्याचा एक महत्त्वाचा आधार आहे. तथापि, काही ठिकाणी या कायद्याची अंमलबजावणी प्रभावीपणे नाही, ज्यामुळे लिंग निवडीच्या प्रथा काही प्रमाणात अजूनही चालू आहेत. त्यामुळे केवळ कायदे नाही तर समाजातील मानसिकतेत बदल आणणे गरजेचे आहे. मुलींचे शिक्षण, आरोग्य, पोषण आणि सुरक्षिततेची हमी देणे, त्यांच्या सामाजिक मूल्याची दखल घेणे आणि त्यांच्या विकासासाठी योग्य वातावरण निर्माण करणे आवश्यक आहे. उदा. हरियाणा राज्यातील पंचकुला जिल्ह्यात २०२५ मध्ये लिंग गुणोत्तर सुधारले असून ते ९५१ वर पोहोचले आहे, जे २०२४ मध्ये ९१४ होते. या सुधारणामागे PCPNDT कायद्याची कठोर अंमलबजावणी, MTP कायद्याची अंमलबजावणी, जिल्हा प्रशासनाची समन्वयित कार्यवाही आणि जनजागृती मोहिमांचा मोठा वाटा आहे. पंचकुला प्रशासनाने १३७ PNDT केंद्रांची, ४६ MTP केंद्रांची आणि १५ BMS क्लिनिकांची तपासणी केली, ज्यामुळे लिंग गुणोत्तरात सुधारणा साधली गेली. तथापि, गाझियाबाद (उत्तर प्रदेश) येथे २०२५ मध्ये लिंग गुणोत्तर ८५३ वर खाली आले आहे, जे बेकायदेशीर गर्भपात केंद्रे आणि लिंग निवडीच्या प्रथांमुळे आहे. या ठिकाणी प्रशासनाने उपाययोजना राबवल्या असल्या तरी समस्या अजूनही गंभीर आहे.

यासोबतच सामाजिक उपाययोजनाही तितक्याच महत्त्वाच्या आहेत. 'बेटी बचाओ बेटी पढाओ' योजना ही या दिशेने एक महत्वाचा उपक्रम आहे. या योजनेचा उद्देश मुलींच्या जन्माचे स्वागत करणे, त्यांचे शिक्षण सुनिश्चित करणे आणि लिंगभेद कमी करणे आहे. या योजनेअंतर्गत मुलींच्या आरोग्य, पोषण, शिक्षण आणि सुरक्षिततेसाठी विविध कार्यक्रम राबवले जातात. शाळा, सामाजिक संस्था आणि स्थानिक समुदाय यामार्फत मुलींच्या हक्कांबाबत जनजागृती केली जाते. समाजात लिंगसमानतेबाबत मानसिकतेत बदल आणण्यासाठी प्रत्येक स्तरावर प्रयत्न आवश्यक आहेत. मुलींच्या विकासासाठी पालक, शिक्षक, प्रशासन आणि समाजाने एकत्रित काम करणे अत्यावश्यक आहे.

मुलींची जन्माला येणाऱ्या संख्येत घट ही फक्त आकडेवारी किंवा सामाजिक प्रश्न नाही, तर त्याचा परिणाम देशाच्या आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक विकासावरही होतो. हा प्रश्न समाजाच्या नैतिकतेची, मूल्यांची आणि विकासाची परीक्षा आहे. लिंगभेदामुळे महिलांवरील हिंसा, लैंगिक छळ आणि समाजातील असमानतेची स्थिती अधिक वाढते. परिणामी, मुलींच्या सुरक्षिततेसाठी आणि समाजाच्या संतुलनासाठी तातडीने उपाययोजना करणे आवश्यक आहे. मुलींच्या जीवनात सकारात्मक बदल घडवणे, त्यांना समान संधी देणे, आणि लिंगभेदाच्या सर्व प्रकारांना विरोध करणे हेच खरे उद्दिष्ट असावे. मुलींचे योग्य स्वागत करणे, त्यांना शिक्षण, आरोग्य आणि सुरक्षितता याची हमी देणे, तसेच लिंगभेदाच्या सर्व प्रकारांना विरोध करणे आवश्यक आहे. आंतरराष्ट्रीय बालिका दिन हा केवळ उत्सव नाही, तर मुलींच्या सुरक्षितता, शिक्षण, आरोग्य आणि लिंगसमानतेसाठी जनजागृतीचा दिवस आहे. या दिवसाच्या निमित्ताने प्रत्येक नागरिक, पालक, शिक्षक, प्रशासक आणि समाजातील घटक मुलींच्या हितासाठी, लिंगसमानतेसाठी आणि समाजाच्या नैतिक विकासासाठी प्रयत्नशील राहणे आवश्यक आहे.

शेवटी, मुलींच्या जन्माला येणाऱ्या संख्येत घट ही केवळ आकडेवारी नाही, तर समाजाच्या नैतिकतेची, मूल्यांची आणि विकासाची परीक्षा आहे. मुलींच्या जन्माला येणाऱ्या संख्येत घट हा समाजातील लिंगभेद आणि मुलींबाबतच्या मानसिकतेचा स्पष्ट सूचक आहे. मुलींच्या सुरक्षिततेसाठी, शिक्षणासाठी आणि सामाजिक विकासासाठी सर्व स्तरावर प्रयत्न करणे आवश्यक आहे. आंतरराष्ट्रीय बालिका दिन हा केवळ उत्सव नाही; तो मुलींच्या सुरक्षितता, शिक्षण, आरोग्य, आणि लिंगसमानतेसाठी मुलींच्या अधिकारांसाठी जनजागृतीचा दिन आहे. मुलींचे योग्य स्वागत करणे, मुलींचा जन्म स्वागतार्ह असावा, त्यांना शिक्षण, पोषण आणि सुरक्षितता मिळावी, आणि लिंगभेदाचा पूर्णपणे विरोध केला जावा ही समाजाची जबाबदारी आहे. मुलींना शिक्षणाची आणि विकासाची संधी देणे, तसेच लिंगभेदाच्या सर्व प्रकारांना विरोध करणे हेच या दिवसाचे खऱ्या अर्थाने औचित्य आहे. या दिवसाच्या निमित्ताने प्रत्येक नागरिक, पालक, शिक्षक, प्रशासक आणि समाजातील घटक मुलींच्या हितासाठी, लिंगसमानतेसाठी आणि समाजाच्या नैतिक विकासासाठी प्रयत्नशील राहणे आवश्यक आहे.



**– डॉ. राजेंद्र बगाटे,**
(लेखक समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

# निरामय

## थकवा का येतो ?

कधी कधी, व्हिटॅमिनची कमतरता हे थकवा येण्याचे प्रमुख कारण असू शकते. मात्र व्हिटॅमिनची कमतरता ओळखणे आणि ती दूर करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. म्हणूनच कोणत्या व्हिटॅमिनची कमतरता थकवा निर्माण करते ते जाणून घेतले पाहिजे.



**थकव्यासाठी कोणते जीवनसत्त्वे जबाबदार आहे?**

✻ व्हिटॅमिन बी १२ च्या कमतरतेमुळे स्मरणशक्ती कमी होणे आणि चक्कर येणे असे प्रकार उद्भवतात. असे झाले तर अंडी, दूध आणि चीज खावे. व्हिटॅमिन बी १२ च्या कमतरतेमुळे शरीरात लाल रक्तपेशींचे उत्पादन कमी होते आणि ऑक्सिजनची कमतरता जाणवते.

✻ व्हिटॅमिन डी च्या कमतरतेमुळे स्नायू दुखणे आणि हाडांचा कमकुवतपणा जाणवतो. हा त्रास कमी करण्यासाठी सूर्यप्रकाशात बसावे. दररोज दूध आणि मासे खावेत. व्हिटॅमिन डी हाडे आणि रोगप्रतिकारक शक्ती लक्षणीयरित्या कमकुवत करत असल्याने काळजी घ्यावी.

✻ थकवा हे व्हिटॅमिन सी च्या कमतरतेचे लक्षण आहे. तो दूर करण्यासाठी संत्री आणि आवळा खावा. हे जीवनसत्व शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यास मदत करते. केस गळणे आणि त्वचेची ॲलर्जी असेल तर डाळी, भाज्या आणि गूळ यांचे आहारातील प्रमाण वाढवावे.

**काय कराल ?**

✻ डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार पूरक आहार घ्या.

✻ नियमित व्यायाम करायला विसरू नका आणि पाणी प्या.

वेळोवेळी रक्त तपासणी करून जीवनसत्त्वांच्या कमतरतेची तपासणी करा.

आरोग्यवेध

**डॉ. प्रसन्न नेने**

वारंवार थकवा जाणवत असेल तर अजिबात दुर्लक्ष करू नका. ही फक्त झोपेच्या कमतरतेमुळे बघायला मिळणारी गोष्ट नसून जीवनसत्त्वाच्या कमतरतेचे लक्षण असू शकते हे लक्षात घ्या. योग्य आहार आणि जीवनशैलीतील बदल स्वीकारून तुम्ही ऊर्जा



## डेंगी आणि तापाचा हृदयावर परिणाम

देशभरातील अनेक राज्यांमध्ये डेंगी आणि विषाणूजन्य तापाचे रुग्ण झपाट्याने वाढत आहेत. डेंगी हा एडिस इजिप्ती डासाच्या चाव्यामुळे होतो तर विषाणूजन्य ताप बदलत्या हवामानामुळे आणि विषाणूजन्य संसर्गामुळे पसरतो. दोन्ही आजारांमध्ये उच्च ताप, अंगदुखी, थकवा आणि अशक्तपणा अशी लक्षणे दिसून येतात.

डेंगीमुळे प्लेटलेटची संख्या झपाट्याने कमी होऊ शकते. विषाणूजन्य ताप सामान्यतः काही दिवसांतच बरा होतो; परंतु तो शरीराची प्रतिकारशक्ती कमकुवत करू शकतो. डेंगी आणि विषाणूजन्य ताप शरीराला आतून कमकुवत करतो. डेंगीमध्ये प्लेटलेट्स कमी झाल्यामुळे रक्तस्त्राव आणि अवयवांचे नुकसान होण्याचा धोका वाढतो. दीर्घकाळापर्यंत विषाणूजन्य ताप यकृत, मूत्रपिंड आणि श्वसनसंस्थेवर दबाव आणू शकतो. या आजारांमुळे सततचा थकवा, डोकेदुखी, सांधेदुखी आणि निर्जलीकरण यासारख्या समस्या देखील उद्भवतात. रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत झाल्यामुळे शरीर इतर संसर्गांना बळी पडते.

**हृदयावरही परिणाम होतो का?**

डेंगी आणि विषाणूजन्य ताप शरीरावरच नाही तर हृदयावरही परिणाम करू शकतो. डेंगीमध्ये, विषाणू थेट हृदयाच्या स्नायूंवर परिणाम करू शकतो. त्यामुळे मायोकार्डिटिस नावाची स्थिती निर्माण होते. यामुळे हृदयाचे ठोके अनियमित होतात आणि पंपिंग क्षमता कमी होते. अनेक प्रकरणांमध्ये, रक्तदाब कमी होणे आणि शॉक यासारखी स्थिती दिसून येते.

आरोग्य विशेष

**डॉ. कुंदन गायकवाड**

**लक्षणे**

विषाणूजन्य तापात दीर्घकाळापर्यंत ताप येणे आणि शरीरातील सूज येणे यामुळे हृदयावर अतिरिक्त ताण येतो. विषाणूजन्य संसर्ग हृदयाच्या स्नायूंवर आणि त्याच्या विद्युत क्रियाकलापांवर परिणाम करू शकतात. त्यामुळे हृदयाचे ठोके असामान्य होतात. डेंगी आणि विषाणूजन्य ताप हृदयरोग असणाऱ्या लोकांसाठी अधिक धोकादायक असू शकतो. अशा परिस्थितीत वेळेवर उपचार आणि योग्य देखरेख केल्याने धोका लक्षणीयरीत्या कमी होऊ शकतो.

**या गोष्टी लक्षात ठेवा**

✻ डासांपासून संरक्षण करण्यासाठी पूर्ण बाह्यांचे कपडे घाला.

✻ घराभोवती पाणी साचू देऊ नका.

✻ जास्त ताप, अंगदुखी किंवा प्लेटलेटची संख्या कमी झाल्यास ताबडतोब डॉक्टरांशी संपर्क साधा.

✻ भरपूर पाणी आणि द्रवपदार्थ प्या.

✻ हृदयरोग्यांनी तापादरम्यान विशेष काळजी घ्यावी.

✻ डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय औषधे घेऊ नका.

**टाळा गोड पदार्थ**

मधुमेह असेल तर साखरेऐवजी गूळ खाल्ल्यास धोका दूर होतो असा एक समज दिसतो. मात्र तो चुकीचा आहे. साखरेप्रमाणेच गुळातही सुक्रोज हा घटक असतो. हा घटक रक्तातील साखरेचं प्रमाण वाढवण्यास कारक ठरतो. गूळ साखरेपेक्षा कमी वेगाने रक्तात मिसळतो. त्यामुळे गुळाच्या सेवनाने ब्लड शुगर वाढत नाही असं नाही मात्र, ती तात्काळ वाढत नाही. हा परिणाम काही वेळाने बघायला मिळतो. गुळामध्ये ६५ ते ८५ टक्के सुक्रोज असल्यामुळे मधुमेहींसाठी याचं सेवन अयोग्य आहे हे समजून घ्यायला हवं. इतकंच नव्हे, तर नैसर्गिक गोडी आहे असं समजून मधुमेहींनी मधाचं सेवन करणंही धोकादायक ठरु शकतं. एकंदरीत, या रुग्णांनी कोणत्याही गोड घटकांचं सेवन मर्यादित ठेवावं. आहार आणि नियमित व्यायामाचं पथ्य पाळणं हाच मधुमेह नियंत्रित ठेवण्याचा सर्वोत्तम मार्ग आहे हे लक्षात घ्यायला हवं.

**घटवा वजन**

वजन कमी करण्यासाठी ॲक्युप्रेशर थेरपीचा अवलंब करणं फायदेशीर ठरतं. यात विशिष्ट केंद्रबिंदूंवर दाब दिला जातो. या प्रेशरमुळे भुकेवर नियंत्रण मिळवणं शक्य होतं सहाजिकच वजन कमी होण्यास मदत होते. यासाठी सर्वप्रथम कानासमोरील बिंदूपाशी म्हणजेच इयर कॅनलसमोरील मांसल भागावर तीन मिनिटे दाब द्या. नियमितपणे हा उपाय योजल्यास भूक नियंत्रित होते. नडगीच्या मागच्या बाजूला हाडाचा भाग संपतो तिथे अंगठा आणि पहिल्या बोटाच्या साह्याने दाब द्यावा. एक मिनिटभर हा दाब पडायला हवा. या उपायाने पचनक्रिया सुधारते आणि वाढत्या वजनावर नियंत्रण मिळवणं शक्य होतं. * दोन्ही हातांच्या अंगठ्याजवळ दोन मिनिटं दाब दिल्यास वजन कमी होण्यास मदत होते. हीच क्रिया पायांजवळही करता येते. * नाभीच्या जवळ दोन्ही बाजूंना दोन बोटांनी एक मिनिटांसाठी दाब द्यावा. यामुळेही पचनक्रिया सुधारण्यास मदत होते.

## मुलांना सतावते सांधेदुखी

भारतात शालेय मुलांना मान, पाठ आणि सांधेदुखीचा त्रास होण्याचे प्रमाण वाढले आहे. एम्स डॉक्टर आणि फिजिओथेरपी तज्ज्ञांनी केलेल्या संशोधनात हे उघड झाले असून संशोधनानुसार, भारतातील ४७ टक्के शालेय मुलांना मान, पाठ आणि सांधेदुखीचा त्रास होतो. एम्स डॉक्टर आणि फिजिओथेरपी तज्ज्ञांनी या अभ्यासासाठी इयत्ता ९ ते १२ पर्यंतच्या ३८० विद्यार्थ्यांची तपासणी केली. या अभ्यासानुसार, चुकीच्या स्थितीत जास्त वेळ बसणे, लॅपटॉप आणि मोबाईल फोनचा वारंवार वापर आणि खेळादरम्यान शारीरिक अडचणी ही मुलांमध्ये वेदनांची मुख्य कारणे आहेत. शिवाय, शाळांमध्ये फिजिओथेरपी तज्ज्ञांची कमतरता ही समस्या वाढवते. या अभ्यासात, मुलांना १२ आठवडे फिजिओथेरपी आणि व्यायाम देण्यात आला. व्यायामामध्ये पुश-अप आणि अडथळा ओलांडणे यासारख्या प्रकारांचा समावेश होता. १२ आठवड्यांनंतरच्या फॉलो-अप चाचणीत मुलांमध्ये मान, पाठ आणि सांधेदुखीमध्ये सुधारणा दिसून आल्या. चौथ्या आठवड्यात मुलांची पुन्हा तपासणी केली जाईल.

दुखणी-उपचार

**डॉ. अजेय गर्जे**

**फिजिओथेरपी तज्ज्ञांची नियुक्ती गरजेची**

या अभ्यासात सहभागी तज्ज्ञ शाळांमध्ये फिजिओथेरपी तज्ज्ञांची आवश्यकता असल्याची शिफारस करतात. संशोधकांच्या मते, हे तज्ज्ञ मुलांना केवळ फिटनेस प्रशिक्षण देत नाहीत तर स्नायू चाचणी, हालचालींचे मूल्यांकन आणि क्रीडा सराव यामध्येही मार्गदर्शन करू शकतात. यामुळे मुलांना शारीरिक समस्या टाळण्यास आणि खेळांमध्ये चांगले प्रदर्शन करण्यास मदत होऊ शकते. 'एम्स'च्या डॉक्टरांनी केलेल्या



या संशोधनाला भारतीय वैद्यकीय संशोधन परिषदेने निधी दिला होता. शालेय मुलांमध्ये फिजिओथेरपीच्या गरजेवर लक्ष केंद्रित करणारा हा पहिला प्रयोग म्हणावा लागेल. हा प्रयोग चार शाळांमधील मुलांवर करण्यात आला.

## हृदयविकाराचा तरुणींना धोका

आजच्या काळात तरुणी करिअर, कुटुंब आणि जबाबदाऱ्यांचे संतुलित करण्याचा प्रयत्न करत असल्या तरी या धकाधकीत त्यांच्या आरोग्याला असणारे धोके वेगाने वाढत आहेत. पूर्वी हृदयविकाराचा झटका प्रामुख्याने वृद्धांना प्रभावित करत असे. तथापि, आता ३०-४५ वयोगटातील तरुणींमध्ये हा धोका झपाट्याने वाढत आहे. दिनचर्येत धोकादायक बदल, ताणतणाव, संप्रेरकांमधील बदल आणि खाण्याच्या चुकीच्या सवयी यामुळे हृदयविकाराचे प्रमाण वाढते आहे. या मुद्द्यांकडे लक्ष दिले आणि आपले शरीर समजून घेतले तर हृदयविकार टाळता येऊ शकतो. आजकाल तरुण महिलांमध्ये हृदयविकाराचे झटके सामान्य आहेत. तथापि योग्य माहिती, दक्षता आणि निरोगी जीवनशैलीन ही त्रिसूत्री लक्षात घेतली तर हा धोका कमी करता येतो. हृदयाच्या आरोग्याची काळजी घेतल्याने आयुष्य वाढतेच शिवाय जगणे सोपेही होते.



**हृदयविकाराची प्रमुख लक्षणे**

✻ हळूहळू किंवा सतत छातीत दुखणे.

✻ अधूनमधून श्वास लागणे.

✻ थकवा येणे, अचानक वजन वाढणे.

✻ पाठ, मान किंवा जबड्यात वेदना

✻ उलट्या किंवा चक्कर येणे.

आरोग्य चर्चा

**डॉ. मेघा दळे**

**हृदयविकाराची गुप्त कारणे**

✻ कामाचा ताण हृदयविकाराचे प्रमुख कारण बनत आहेत.

✻ जंक फूड, योगाभ्यास न करणे आणि झोपण्याच्या आणि उठण्याच्या वेळेचे नियमित पालन न करणे.

✻ महिलांमध्ये इस्ट्रोजेनची पातळी कमी होणे किंवा हार्मोनल विकार.

✻ कुटुंबातील एखाद्याला हृदयविकार असेल तर धोका वाढतो.

✻ सिगारेट आणि मद्यपान यामुळे हृदयविकार होऊ शकतो.

**प्रतिबंधात्मक उपाय**

✻ तरुण महिलांनी दैनंदिन दिनचर्येत काही बदल केल्यास हृदयविकाराचा धोका कमी होऊ शकतो.

✻ त्यासाठी फळे, भाज्या आणि ओमेगा-३ फॅटी ॲसिडयुक्त आहार घेण्यास सुरुवात करा.


✻ कमीतकमी ३० मिनिटे चालणे किंवा योगा करणे आवश्यक आहे.

✻ ध्यान करणे फायदेशीर

✻ मद्यपान आणि सिगारेट टाळणे आवश्यक

## कोणत्या चाचण्या करून घेऊ?

मी २२ वर्षांचा तरूण असून वजन ७२ किलो आहे. सात वर्षांपूर्वी मला उच्च रक्तदाबाचं निदान झालं. सततच्या डोकेदुखीमुळे शारीरिक तपासणी केली असता ही समस्या समोर आली. डॉक्टरांनी मेटोलर (५० एमजी) गोळी सुरू केली. अजूनही मी ही गोळी घेत आहे. औषधांमुळे रक्तदाब नियंत्रणात आहे. नुकतीच माझी कार्डिओलॉजिस्ट असणाऱ्या नातेवाईकांशी भेट झाली. त्यांनी मला औषध बदलण्याचा सल्ला दिला. मेटोलरमुळे भविष्यात मधुमेहाचा तसंच नपुंसकत्त्व येण्याचा धोका वाढतो, असं त्यांनी सांगितलं. असं असताना मी दुसरं औषध घ्यायला हवं का? कोणत्या चाचण्या करू? या नातेवाईकांनी मला रेनल डोपलर चाचणी करायला सांगितली आहे. ती करु की नको?



**उत्तर :** रक्तदाब नियंत्रणात असणं ही चांगली बाब आहे. पण कमी वयात उच्च रक्तदाबाचं निदान झाल्याने काही चाचण्या करायला हव्या. रेनल आर्चरी स्टेनोसिसमुळे असं होऊ शकतं. त्यामुळे ही शक्यता पडताळून पाहायला हवी. तू एका चांगल्या डॉक्टरांना भेट. तसंच आरोग्यदायी जीवनशैलीचा अवलंब कर. वजन नियंत्रणात ठेव. मीठाचं प्रमाण कमी कर. धूम्रपान, मद्यपान करू नकोस. नियमित व्यायाम कर. यामुळे तुझा रक्तदाब नियंत्रणात राहण्यास मदत होईल.

विचारा प्रश्न

## सांधेदुखीवर 'प्लेटलेट-रिच प्लाझ्मा' थेरपी

सांधेदुखीची समस्या लाखो लोकांना प्रभावित करते. त्यांच्या दैनंदिन जीवनावर आणि एकूण आरोग्यावर घातक परिणाम करते. मात्र यावरील उपचार पर्यायांच्या यादीमध्ये, 'प्लेटलेट-रिच प्लाझ्मा' (पीआरपी) थेरपी एक चांगला उपाय म्हणून उदयास येत आहे. 'पीआरपी थेरपी' सांधेदुखी आणि जखमा बरे करण्यासाठी शरीराच्या नैसर्गिक उपचार क्षमतेचा वापर करते. सांधेदुखी ही एक सामान्य समस्या असून ती वृद्धत्व, दुखापत किंवा दीर्घकाळापर्यंत चुकीच्या स्थितीत राहिल्यामुळे गुडघ्याचे सांधे जलद बिघडल्याने उद्भवू शकते. औषधे, फिजिओथेरपी आणि शस्त्रक्रियेवर अवलंबून राहण्याऐवजी 'पीआरपी थेरपी' शस्त्रक्रियेविना सांधेदुखीपासून आराम देते. ही थेरपी जीर्ण झालेले कार्टिलेज पुन्हा निर्माण करू शकते आणि गुडघ्याची ताकद पुनर्संचयित करू शकते.



**'पीआरपी थेरपी' म्हणजे काय?**

'पीआरपी थेरपी' म्हणजे नैसर्गिक उपचारांच्या मदतीने शरीराच्या अवयवांवर उपचार करणे. सांधेदुखीवर नैसर्गिक उपचार केले जातात. प्रथम रुग्णाचे रक्त घेतले जाते आणि प्लेटलेट्स आणि वाढीचे घटक वेगळे करण्यासाठी सेंट्रीफ्यूजमध्ये ठेवले जाते. नंतर हे केंद्रित 'पीआरपी' द्रावण थेट प्रभावित सांध्यामध्ये इंजेक्ट केले जाते. यामुळे सांधेदुखी कमी होते, सूज कमी होते आणि सांधे दुरुस्त होण्यास गती मिळते.

**'पीआरपी थेरपी' कशी कार्य करते?**

प्लेटलेट्स रक्त गोठण्यास आणि जखमा बरे करण्यास जबाबदार असतात; परंतु त्यामध्ये वाढीचे घटकदेखील असतात. ते सांधे आणि ऊतींच्या दुरुस्तीला प्रोत्साहन देतात. ते पेशींच्या पुनरुत्पादनास गती देतात, वेदना कमी करतात. सांध्यांची हालचाल सुधारतात आणि जलद आराम देतात.

**सांधेदुखीसाठी ते प्रभावी आहे का?**

तज्ज्ञांचे मत आहे, की 'पीआरपी थेरपी' सौम्य आणि मध्यम ऑस्टियोआर्थरायटिससाठी प्रभावी असू शकते. अनेक प्रकरणांमध्ये, रुग्णांनी या थेरपीनंतर वेदना कमी झाल्याचे आणि सांध्यांच्या कार्यात सुधारणा झाल्याचे नोंदवले आहे. शिवाय, 'पीआरपी'चे कमीत कमी दुष्परिणाम होतात कारण त्यात शरीरातील रक्ताचाच वापर असतो.

आरोग्यमंत्र

**डॉ. अभय दगडे**

**'पीआरपी थेरपी'चे फायदे**

✻ शस्त्रक्रियेची आवश्यकता नाही

✻ खूप कमी दुष्परिणाम


✻ रुग्ण आरामात दैनंदिन काम सुरू करू शकतात.

✻ परिणाम दीर्घकाळ टिकतात.

✻कमकुवत सांधे पुन्हा कार्य करू लागतात.

नवसंशोधन

### लाळेची किफायतशीर चाचणी



कर्करोगाच्या निदानाची प्रक्रिया खूप गुंतागुंतीची आणि खर्चिक असते. पण शास्त्रज्ञांच्या प्रयत्नांमुळे कर्करोगाचं निदान किफायतशीर अशा लाळेच्या चाचणीने होऊ शकतं. या अत्यंत किफायतशीर अशा लाळेच्या चाचणीमुळे ह्युमन पॅपिलोमा १६ विषाणूचं निदान करता येतं. हा विषाणू घसा, तोंडाच्या कर्करोगाला कारणीभूत ठरू शकतो. या चाचणीमुळे तोंडाच्या तसंच घशाच्या कॅन्सरचं वेळेत निदान होऊ शकतं. अमेरिकेतल्या ड्यूक विद्यापीठातल्या शास्त्रज्ञांनी याबाबत संशोधन केलं आहे. हे तंत्रज्ञान इतर काही विकारांच्या निदानासाठी उपयुक्त ठरू शकतं, असंही शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे.

दंतारोग्य

### ओव्याने दूर करा तोंडाच्या समस्या




हिरड्या सुजणं, तोंडाची दुर्गंधी या मौखिक आरोग्याशी संबंधित सर्वसाधारण समस्या आहेत. तोंड स्वच्छ ठेवलं नाही तर दातांमध्ये साठलेलं अन्न कुजून दुर्गंध येऊ लागतो. ही समस्या दूर करण्यासाठी बरेच उपाय केले जातात. ओव्याच्या पाण्याने तोंडाची दुर्गंधी दूर होऊ शकते. यासाठी थोड्या पाण्यात ओवा घालून उकळून घ्या. या पाण्याने चूळ भरल्यामुळे तोंडाच्या दुर्गंधीची समस्या कमी होऊ शकते. हिरड्यांमधून रक्त येत असेल तर ओव्याच्या तेलाचे काही थेंब गरम पाण्यात घालून या पाण्याने चूळ भरल्यामुळे हिरड्यांमधलं रक्त थांबू शकतं.

जपणूक त्वचेची

### त्वचेवर दिसतात परिणाम

शरीरात एखाद्या पोषक घटकाची कमतरता असल्यास त्याची लक्षणं दिसू लागतात. त्वचा पांढरी पडणं, त्वचेवर चट्टे पडणं, पिंपल्स येणं ही एखाद्या पोषक घटकाच्या कमतरतेची लक्षणं असू शकतात. त्वचा निस्तेज, पांढरट दिसणं हे बी १२ या जीवनसत्त्वाच्या कमतरतेचं लक्षण असू शकतं. त्वचेवर पुरळ किंवा पिंपल्स येत असतील तर हे 'अ' आणि 'ई' या जीवनसत्त्वांच्या कमतरतेचं लक्षण ठरू शकतं. त्यामुळे त्वचेच्या समस्या असतील तर या जीवनसत्त्वांच्या कमतरतेची तपासणी नक्की करून घ्या.



आजीबाईचा बटवा

### नैराश्यावर प्रभावी उपाय



सध्या अनेकांना नैराश्याने ग्रासल्याचं पहायला मिळतं. नैराश्याच्या या समस्येवर बरेच उपचार करावे लागतात. पण काही घरगुती उपायांनी तुम्हाला बरं वाटू शकतं. हळद आणि लिंबाच्या मिश्रणामुळे नैराश्य तसंच इतर मानसिक आजारांमध्ये बरं वाटू शकतं. यासाठी एका भांड्यात चार कप पाणी घ्या. त्यात एका लिंबाचा रस घाला. यात दोन चमचे हळद आणि चार चमचे मध घाला. हे सर्व घटक नीट मिसळून घ्या. दिवसातून दोन वेळा हे पाणी प्या. यामुळे लाभ होतील. हळदीतल्या पोषक घटकांमुळे नैराश्याची तीव्रता कमी होऊ शकते.

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्ठात नमूद केलेली मिळकत विद्यमान मालक यांच्या मालकी हक्काची व कब्जे वहिवाटीची आहे. नमूद मिळकतीच्या मा.महसुल प्रशासनाकडील ७/१२ दप्तरी आणि आज रोजीच्या संगणकीय ७/१२ दप्तरी विद्यमान मालक यांच्या नावाची नोंद झालेली आहे. नमूद मिळकतीची विक्री करण्याची बोली विद्यमान मालक यांनी आमच्या अशिलाबरोबर केलेली आहे त्याद्वारे नमूद मिळकत कायमखूष खरेदी कामी आमच्या अशिलास प्रस्ताव दिलेला आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहु नये म्हणून या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की नमूद मिळकतीबाबत कोणतेही चालु वाद असल्यास अथवा साठेखत, खरेदीखत, गहाणखत, दान, वारस हक्क, बक्षिसपत्र मनाईहुकुम, दावा कोर्ट कारवाई बॅक बोजा सोसायटी राईटस अन्न वस्त्र लिज अथवा अगर कोणताही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास संबंधीताने ही नोटीस प्रसिध्द झाले पासून ०७ दिवसांचे आत खालील दिलेल्या पत्यावर संपुर्ण प्रशासकीय व न्यायिक कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे. यथायोग्य कागदोपत्री पुराव्याशिवाय आलेल्या व कोणत्याही पुराव्याशिवाय प्रस्तुत जाहीर नोटीसीस केवळ वर्तमानपत्रातून घेतलेल्या कोणत्याही हरकती ग्राह्य धरता येणार नाही. विहित ०७ दिवस मुदतीत कोणाचीही कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत न आल्यास आमचे अशिल विद्यमान मालक यांच्या समवेत कायदेशीर रजिस्टर दस्तांन्वये विद्यमान मालक यांच्या मालकी हक्काच्या मिळकत क्षेत्राचा कायदेशीर प्रशासकीय परवानगी घेऊन हस्तांतरणाच्या दस्ताचा व्यवहार पूर्ण करतील तद्नंतर कोणाचेही कोणत्याही प्रकारे तक्रार अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिले आहे असे समजण्यांत येईल.

**परिशिष्ट : मिळकतीचे वर्णन :–** जिल्हा अहिल्यानगर, पोट तुकडी ता. नगर पैकी अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील मौजे चाहुराणा बुद्रुक येथील मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

अ) सर्व्हे नंबर — क्षेत्रफळ आर.चौ.मी.
१०८/१अ/६/१/५ — ३७६.८५ चौ.मीटर
(संगणकीय ७/१२ प्रमाणे ३.७६.८५ आर.चौ.मी.)

विद्यमान मालक यांच्या कायदेशीर मालकीहक्काची व प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीची नमूद संपूर्ण मिळकत. यांसी चतुःसिमा–महसूल व प्रशासकीय रेकॉर्डप्रमाणे व असलेल्या प्रत्यक्ष परिस्थितीप्रमाणे.

ब) सर्व्हे नंबर — क्षेत्रफळ
१०८/अ१/६/१/३ पैकी — हे. ०७ आर
(संगणकीय ७/१२ प्रमाणे ०.०७.०० आर.चौ.मी.)

यापैकी विद्यमान मालक यांच्या कायदेशीर मालकीहक्काची व प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीची ०.००.२९ आर.चौ.मी. ही संपूर्ण मिळकत. यांसी चतुःसिमा–महसूल व प्रशासकीय रेकॉर्डप्रमाणे व असलेल्या प्रत्यक्ष परिस्थितीप्रमाणे. येणेप्रमाणे चतुःसिमापूर्वक काही एक राखून न ठेविता.

**मिळकतीचे विद्यमान मालक–**
**१) संकेत नंदू आगरकर**
**२) हेमंत बाजीराव पोकळे**
दोघेही रा. नेप्ती नाका, अहिल्यानगर

दि.११/१०/२०२५
अहिल्यानगर

**ॲड.संदिपकुमार दादासाहेब पाखरे**
बी.ए.एलएल.बी, नोटरी पब्लिक, भारत सरकार
**ॲड.सौ.श्रुती संदिपकुमार पाखरे**
बी.ए.एलएल.एम., २७०, लॉयर्स ऑफिस, लक्ष्मी दिप निवास, बालिकाश्रम हायस्कूलजवळ,अहिल्यानगर, मो : ९८५०१८१७१७


# ‘छत्रपती शिवाजी महाराज आजच्या काळात जन्मले तर’ यावर आपला मावळा संघटनेतर्फे राज्यस्तरीय निबंध स्पर्धेचे आयोजन

### दिवाळीनिमित्त खासदार नीलेश लंके यांची संकल्पना

नगर – दिवाळीनिमित्त खासदार नीलेश लंके यांच्या संकल्पनेतून ‘आपला मावळा संघटना’ विद्यार्थ्यांसाठी एक प्रेरणादायी आणि विचारप्रवर्तक उपक्रम घेऊन आली आहे. ‘जर छत्रपती शिवाजी महाराज आजच्या काळात जन्मले तर’ या विषयावर राज्यस्तरीय निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून विद्यार्थ्यांना इतिहास आणि आधुनिक काळातील नेतृत्वगुण यांचा अभ्यास करण्याची त्यातून संधी मिळणार आहे.

ही स्पर्धा ८ ते १५ वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी खुली असून छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा अभ्यास करून त्यांचा आधुनिक समाजाशी संबंध कसा जुळवता येईल, यावर आपले विचार मांडण्याची संधी मिळणार आहे. आदर्श नेतृत्वाची प्रेरणा विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करणे, समाजिक बांधिलकीची जाणीव वाढवणे, स्वराज्य, धैर्य आणि न्याय यांची संकल्पना आजच्या काळात कशी लागू शकते, हे समजून घेणे हा या उपक्रमामागील हेतू आहे.

या स्पर्धेचा कालावधी २३ ऑक्टोबरपर्यंत आहे. दिलेल्या विषयावर हस्तलिखित ३०० ते ४०० शब्दांपर्यंत निबंध लिहावा. ई मेल किंवा पोष्टाद्वारे लिहिलेला निबंध पाठवावा. निबंध पाठविण्यासाठी ई मेल आयडी – aplamavlagmail.com

पोष्टाने पाठविण्यासाठी पत्ता : खासदार नीलेश लंके संपर्क कार्यालय, ईगल प्राईड बिल्डिंग, चाणक्य चौकाजवळ, अहिल्यानगर ४१४००१ तसेच खासदार नीलेश लंके संपर्क कार्यालय, समर्थ कॉम्प्लेक्स, पारनेर सुपा रोड, पारनेर जिल्हा अहिल्यानगर ४१४३०२, निबंधासोबत विद्यार्थ्यांनी पूर्ण नाव, वय, पत्ता आणि संपर्क क्रमांक नमूद करणे आवश्यक आहे. विषयाबाहेरील किंवा नियमांचे पालन न करणारे निबंध स्वीकारले जाणार नाहीत. अधिक माहितीसाठी ९४२२४५८४६२ व ९६३७९४३३३ या क्रमांकावर संपर्क साधावा.

### रोख बक्षिसांसह सन्मानचिन्हाने होणार गौरव

या स्पर्धेतील प्रथम क्रमांकाच्या विद्यार्थ्यास १० हजार ३३३ रूपये रोख, स्मृतीचिन्ह तसेच सन्मानपत्र, व्दितीय क्रमांकास ७ हजार ३३३ रूपये, सन्मानचिन्ह व सन्मानपत्र, तृतीय क्रमांकास ५ हजार ३३३ रूपये, सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, चतुर्थ क्रमांकास ३ हजार ३३३ रूपये, सन्मानचिन्ह, सन्मानपत्र तर पाचव्या क्रमांकास २ हजार ३३३ रूपये, सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे. तर स्पर्धेत सहभागी सर्व विद्यार्थ्यांना खा. नीलेश लंके यांची स्वाक्षरी असलेले प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहे.

### स्वराज्याची संकल्पना जागवण्याचा प्रयत्न

ही स्पर्धा केवळ लेखनासाठी नाही, तर विद्यार्थ्यांच्या विचारशक्तीला चालना देणारी, नेतृत्वगुण वाढवणारी आणि इतिहासातील आदर्शांचे आधुनिक काळाशी संबंध समजावणारी एक संधी आहे. विद्यार्थ्यांना विचार करण्याची संधी मिळेल की छत्रपती शिवाजी महाराज आजच्या जगात जन्मले असते तर त्यांनी समाजातील आव्हाने, तंत्रज्ञानाचा वापर आणि नेतृत्वगुण कसे दाखवले असते. आजच्या बदलत्या काळात स्वराज्याची, धैर्याची आणि सामाजिक बांधिलकीची संकल्पना पुन्हा जागवण्याचा हा उपक्रम महत्वाचा ठरेल. महाराष्ट्रभरातील विद्यार्थी आपला निबंध सादर करून आपल्या विचारांची साक्ष दाखवू शकतात.

# वेतन लेखा कार्यालयाच्या वतीने १६ ऑक्टोबर रोजी स्पर्श आउटरीच कार्यक्रमाचे आयोजन

नगर – एसबीआय चौकातील संरक्षण खात्याच्या वेतन लेखा कार्यालयाच्या एसीआर व एमआयआर विभागाच्या वतीने या कार्यालयात १६ ऑक्टोबर रोजी संरक्षण खात्यातील पेन्शनधारकांसाठी डीएलसी ४.० मोहिमेसह स्पर्श आउटरीच कार्यक्रमा चे आयोजन करण्यात आले आहे. भारत सरकारच्या पेन्शनधारक आणि पेन्शनधारक कल्याण विभागाने १ ते ३० नोव्हेंबर दरम्यान देशव्यापी डिजिटल जीवन प्रमाणपत्र मोहीम ४.० सुरू केली आहे.

संरक्षण खात्यातील निवृत्त पेन्शनधारकांच्या वार्षिक जीवन प्रमाणपत्र (लाईफ सर्टिफिकेट) साठी पुणे येथील प्रधान नियंत्रक संरक्षण लेखा (दक्षिण कमान) यांच्या मार्गदर्शनाखाली या कालावधीत ही मोहीम अहिल्यानगरच्या या कार्यालयात रबावण्यात येणार आहे. सर्व संरक्षण खात्यातील पेन्शनधारकांपर्यंत फेस ऑथेंटिकेशन तंत्रज्ञान आणि इतर डिजिटल जीवन प्रमाणपत्रांचे जास्तीत जास्त फायदे पोहोचवणे हे या मोहिमे मागचे उद्दिष्ट असुन मोहिमेचा लाभ घेण्यासाठी, संरक्षण खात्यातील निवृत्त पेन्शनधारक आणि कुटुंब पेन्शनधारक यांनी स्पर्श नोंदणीकृत मोबाइल क्रमांक तसेच स्पर्श पीपीओ क्रमांक, आधार कार्ड आणि बँक पासबुक व इतर आवश्यक कागदपत्रांसह वेतन लेखा कार्यालयाच्या एमआयआर विभागात संपर्क साधावा असे आवाहन कार्यालयावतीने करण्यात आले आहे.






# महापालिकेच्या निवडणुकीत भ्रष्ट मार्गाचा अवलंब करून दुबार, तिबार, मयत मतदारांची संख्या मोठ्या प्रमाणात

### लोकशाहीच्या पावित्र्यासाठी चौकशी व्हावी : जयंत येलुलकर यांची मागणी

नगर – अहिल्यानगर महापालिकेच्या निवडणुकीत पालिकेतील निवडणूक कर्मचाऱ्यांना (बीएलओ) हाताशी धरून खोटे मतदार, प्रभागातील न राहणाऱ्या परंतु आपले नातेवाइक मित्र, कार्यकर्त्यांची नावे चुकीच्या पद्धतीने, भ्रष्ट व्यवहार करीत घुसडण्यात आली होती. या संदर्भात अनेकांनी तक्रारी करूनही त्यावर काहीही कार्यवाही झाली नाही. अनेक प्रभागातील मतदार यादीमध्ये मयत मतदार मोठ्या प्रमाणात असून एकेका प्रभागात दुबार, तिबार तसेच बनावट मतदार आहेत. त्याची चौकशी करून येत्या निवडणुकीत असे प्रकार होणार नाहीत याची काळजी घ्यावी. निवडणुकीच्या प्रभाग मतदारयादी लोकशाही पद्धतीने तयार व्हावी त्यामध्ये पारदर्शीपणा असावा मतदार हेराफेरी होऊ नये अन्यथा नेहमीप्रमाणे मतदार यादीची री ओढण्याचा प्रकार होईल, असा आरोप माजी नगरसेवक जयंत येलुलकर यांनी केला आहे.

ते पुढे म्हणाले की ईव्हीएम मशीन द्वारे मतदान न होता पेपर बॅलेटवर व्हावे. बाबासाहेबांच्या संविधानाचा आदर करीत निवडणूका व्हाव्यात. तरच लोकशाही जिवंत राहून लोकशाही टिकेल. जिल्हा निवडणूक कार्यालया मार्फत प्रामाणिक पणे निवडणुका घेतल्या जाव्यात. अन्यथा आज देशात मतदान प्रक्रियेबाबतीत जनतेच्या मनात जो संभ्रम आहे त्याचा अनुनय होतो, आहे असा संशय सामान्य जनतेत होईल. ज्या कर्मचाऱ्यांनी भ्रष्ट मार्गाचा अवलंब करीत संगनमताने अशा सदोष मतदार याद्या तयार केल्या आहेत, त्याची सखोल चौकशी करावी व यात गुंतलेल्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करून लोकशाहीचे पावित्र्य राखावे, अशी मागणी श्री. येलुलकर यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.

मागील निवडणुकीमध्ये काही राजकीय पदाधिकाऱ्यांनी अधिकाऱ्यांना हाताशी धरून आपल्या मनाप्रमाणे प्रभाग रचनेत हस्तक्षेप केला हे लोकशाहीच्या दृष्टीने, शहराच्या विकासाच्या दृष्टीने घातक आहे. काही प्रभागात २० हजार मतदार होते पण प्रत्यक्षात ११ हजारच होते. बाकी सारे दुबार, तिबार, मयत होते, हे गंभीर आहे. निवडणुकीत संगनमताने मयत मतदारांचे मतदान करून घेतले जाते. म्हणूनच मयत मतदार निवडणुकीत समाविष्ट केली जातात. ही लोकशाहीची थट्टा आहे व याला संबंधित अधिकारी व कर्मचारी जबाबदार आहेत.

निवडणूक अधिकाऱ्यांनी निवडणूक आणि त्यातील सदोष यंत्रणा हा देशात आज चर्चेचा विषय झाला आहे. यातून बोध घ्यावा व पारदर्शी मतदार यादी तयार करण्याच्या सूचना कर्मचारी, अधिकाऱ्यांना द्याव्यात. अन्यथा सरकारी कर्मचारी यामध्ये सामील आहेत, असा समज होईल. जर आमच्या मागणीची योग्य दखल घेतली गेली नाही तर न्यायालयात दाद मागावी लागेल.

प्रभाग रचना संगनमताने केली की, नियमानुसार लोकशाही पद्धतीने याची सखोल चौकशी करावी, हे निवडणूक आयोगाचे दायित्व आहे.

बोगस मतदार, दुबार मतदार, मयत मतदार समाविष्ट करीत प्रभाग रचनेत मोठा आर्थिक भ्रष्टाचार करून, संबंधित कर्मचाऱ्यांना, बीएलओंना हाताशी धरून स्वतःच्या फायद्यासाठी हवा तसा बदल करणे. ही पारदर्शी लोकशाहीची ओळख नसून हा भारतीय संविधानाचा अपमान आहे. मतदार यादीचे पुनर्परीक्षण व्हायला हवे. डिजिटल मतदार यादीमध्ये पारदर्शता यावी. लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागतील अन्यथा ही प्रक्रियाच धोक्यात येईल.

संविधानाचे पावित्र्य राखण्यासाठी व मतदारांची फसवणूक टाळण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी लक्ष घालावे, अशी मागणीही श्री. येलुलकर यांनी केली आहे.


## ट्रूहोम फायनान्स लिमिटेड
(पूर्वी श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड)

Truhome FINANCE
**नोंदणीकृत कार्यालय:** श्रीनिवास टॉवर, पहिला मजला, दरवाजा क्र.५, जुना क्र. ११ दुसरी गल्ली, सिनातोफा रोड, अलवारपेट, तेनमपेट, चेन्नई–६०००१८; **मुख्यालय :** लेव्हल – ३, वोक्हार्ट टॉवर्स, ईस्ट विंग सी–२, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई ४०००५१ **वेबसाइट:** http://www.truhomefinance.in

### प्रतिकात्मक ताबा सूचना

तर, ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वी श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड) चे अधिकृत अधिकारी म्हणून खाली स्वाक्षरी केलेले व्यक्ती यांनी सिक्युरिटायझेशन अँड फायनान्शियल ॲसेट्सचे पुनर्निर्माण आणि सुरक्षा व्याज अंमलबजावणी कायदा, २००२ (उक्त कायदा) च्या तरतुदींनुसार आणि सुरक्षा व्याज (अंमलबजावणी) नियम, २००२ (उक्त नियम) च्या नियम ३ सह वाचलेल्या उक्त कायद्याच्या कलम १३(१२) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून कर्जदारांना मागणी नोटिस जारी केल्या आहेत ज्यांचे तपशील खालील तक्त्यात नमूद केलेल्या मागणी नोटिसमध्ये नमूद केलेल्या रकमेची परतफेड करण्यासाठी दिले आहेत. कर्जदारांनी रक्कम परतफेड करण्यात अयशस्वी झाल्यामुळे, कर्जदारांना आणि सर्वसामान्य जनतेला सूचना देण्यात येते की, अधिकृत अधिकारी ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वी श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड) यांनी २५/०९/२०२५ रोजी सदर कायद्याच्या कलम १३(४) आणि नियम ८ अंतर्गत त्यांना देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून येथे वर्णन केलेल्या मालमत्तेचा प्रतीकात्मक ताबा घेतला आहे.

कर्जदाराला विशेषतः आणि सर्वसामान्य जनतेला येथे इशारा देण्यात आला आहे की त्यांनी मालमत्तेशी व्यवहार करू नये आणि मालमत्तेशी कोणताही व्यवहार केल्यास येथे नमूद केलेल्या रकमेसाठी ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वी श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड) कडून व्याजासह शुल्क आकारले जाईल. कर्जदाराचे लक्ष कायद्याच्या कलम १३ च्या उप–कलम (८) च्या तरतुदींकडे आकर्षित केले जाते, उपलब्ध वेळेनुसार, सुरक्षित मालमत्ता परत मिळविण्यासाठी.

### कर्जदाराचे नाव आणि पत्ता

१. श्री. सुरेश गुरुनाथ सांगापूरकर (कर्जदार)
२. श्रीमती सुजाता सुरेश सांगापूरकर (सह–कर्जदार)
३. श्रीमती शशिकला गुरुनाथ सांगापूरकर (सह–कर्जदार)
सध्याचा पत्ता : ओंकार नगर, शाहूनगर, प्लॉट क्रमांक १२०, केडगाव विठ्ठल रुख्मिणी मंदिराजवळ,अहमदनगर –४१४००१ (महाराष्ट्र)
मालमत्तेचा पत्ता: सर्व्हे क्रमांक ५००, १ केडगाव, पीएल क्रमांक १२०, एन.ए.केडगाव, अहमदनगर–४१४००५

### डिमांड नोटीसनुसार देय रक्कम

मागणी सूचना दिनांक ११/०७/२०२५
मागणी सूचना रक्कम : दिनांक ०९–०७–२०२५, रु.२९,३१,२०१/–
(रुपये एकोणतीस लाख एकतीस हजार दोनशे एक फक्त)
आतापर्यंत नमूद केलेले पुढील व्याज आणि अनुषंगिक खर्च इत्यादी.
कर्ज खाते क्रमांक. **SLPHAMDRO000634**

### मालमत्तेचे वर्णन

यामध्ये सर्व मालमत्तांचा समावेश आहे ज्यामध्ये प्लॉट क्रमांक १२०, क्षेत्रफळ १८०.०० चौ.मी. आहे. सर्व्हे क्रमांक ५००/१ (त्यावरील बांधकामासह), केडगाव, अहमदनगर. पूर्व: श्री. जाधव यांचे घर (सर्व्हे क्रमांक ४९९/१/४), पश्चिम: १५ फूट बिटुमेन रोड, उत्तर: श्री. कर्डिले यांचे घर (प्लॉट क्रमांक १२१), दक्षिण: खुला भूखंड (प्लॉट क्रमांक ११९)

सही/–अधिकृत अधिकारी
ट्रूहोम फायनान्स लिमिटेड
(पूर्वीची श्रीराम हौसिंग फायनान्स लिमिटेड)

ठिकाण: अहमदनगर
दिनांक ०९–१०–२०२५








## जाहीर नोटीस

प्रति.
श्री.घोरपडे हिरामण हरीभाऊ
नगर–कल्याण रोड, नेप्ती नाका, नालेगाव
ता.जि.अहिल्यानगर — : अर्जदार

विरुध्द

अधिकारी जन्म मृत्यू नोंदणी विभाग.
अहिल्यानगर महानगरपालिका,अहिल्यानगर — : सामनेवाले

ज्याअर्थी, अर्जदार श्री.घोरपडे हिरामण हरिभाऊ यांनी सदरचा अर्ज जन्म–मृत्यू नोंदणी अधिनियम. १९६९ चे कलम १३(३) अन्वये मा.अपर तहसिलदार अहिल्यानगर यांचे न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार श्री.घोरपडे हिरामण हरिभाऊ यांनी त्यांची पत्नी नामे कै.शितल हिरामण घोरपडे यांचा दि. ०४/०५/२०२३ रोजी मृत्यू झालेला आहे. त्यांचे मृत्यूची नोंद प्रतिवादी यांचेकडे होऊन तसे मृत्यू प्रमाणपत्र मिळणेकरिता सदरचा अर्ज मे. न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी, कै.शितल हिरामण घोरपडे यांचा दि.०४/०५/२०२३ रोजी मृत्यू झालेला नाही, असे जर कोणाचे म्हणणे असल्यास, त्यांनी या जाहीर नोटीस प्रसिध्दीचे दिनांकापासून १५ दिवसांचे आत आपली लेखी हरकत कागदपत्र पुरावे मा. अपर तहसिलदार अहिल्यानगर यांचे कार्यालयात सादर करावे. तसेच मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर कार्यालय अर्जदाराचा पुरावा घेऊन वर नमूद अर्जदार यांची पत्नी नामे कै.शितल हिरामण घोरपडे यांचे दि. ०४/०५/२०२३ रोजीच्या मृत्यूची नोंद सामनेवाला यांचेकडे घेऊन तसा दाखला अर्जदार यांना देण्याचा हुकुम करतील. तद्नंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार गृहीत धरली जाणार नाही. येणेप्रमाणे आज दिनांक ०७/१०/२०२५ रोजी जाहीर नोटीस माझे सही व शिक्यानिशी दिली असे.

**स्वप्निल ढवळे**
अपर तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अहिल्यानगर




अविष्कार स्पर्धेत झोनल लेव्हलवर आयएमएस सहभागी विद्यार्थी.

# अविष्कार स्पर्धेत झोनल लेव्हलवर आयएमएस सहभाग

नगर – सा.फुले पुणे विद्यापीठाच्या वतीने दरवर्षी अविष्कार हि मुलांमधील गुणांना वाव देण्यासाठी स्पर्धा भरवली जाते. संस्था स्तरावर घेण्यात आलेल्या स्पर्धेत एमबीए, एमसीए, बीबीए व बीसीए या अभ्यासक्रमाच्या एकूण ४० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या १७ संशोधन पोस्टर मधून ८ पोस्टर झोनल लेव्हल स्पर्धेत पाठवण्यात आली. हि स्पर्धा नगर येथील न्यू आर्ट्स कॉम व सायन्स कॉलेज येथे होती.

या स्पर्धेतून विद्यार्थ्यांच्या संशोधन गुणांना प्रोत्साहन तसेच चालना मिळते. व्यवस्थापन अभ्यासक्रमात या गुणांना महत्व असते. या स्पर्धेत एमबीए विभागातून सिद्धी गांधी, अदिती गुजराथी, मानसी जोशी, साक्षी टेमघरे, मयूर नलावडे, अबुजर तांबोळी, साक्षी रचा एमसीए विभागातून रीफत बागवान, सुनील फसले, ओम पेंडूरकर, सामुअल तिवडे, पियुष वाघमोडे, गरिमा ताडव बीबीए विभागातून धर्मील पटवा, कल्याण बागरेचा, नेहा खंडेलवाल तर बीसीए विभागातून शाफिया मुजावर, खादिजा शेख यांनी सहभाग घेतला.

सर्व विद्यार्थ्यांना संशोधन विभाग समन्वयक डॉ. राहुल खंडेलवाल, प्रा साक्षी मध्यान, प्रा. श्रुती राव, प्रा सुप्रिया सापा यांनी मार्गदर्शन केले. या यशाबद्दल संस्थेचे संचालक डॉ. एम बी मेहता, उपसंचालक डॉ विक्रम बार्नबस यांनी अभिनंदन केले.

# अ.ए.सो.च्या भिंगार हायस्कूलचे कला क्षेत्रात यश

नगर – कलाभारती चाईल्ड आर्ट डेव्हलपमेंट इन्स्टिट्युट पुणे या संस्थेने घेतलेल्या रंगभरण व हस्तक्षर स्पर्धेत अ.ए.सो. च्या भिंगार हायस्कूलच्या विद्यार्थ्यानी नेत्रदीपक यश मिळवले. या स्पर्धेत विद्यालयातील बहुसंख्य विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. त्यापैकी या स्पर्धेत ०३ विद्यार्थ्यानी यश मिळवले. त्यामध्ये कु. शेलार अनुष्का संदिप इ. ७वी (ब), कु. औरंगे निकिता प्रमोद इ. ५ वी (ब) व कु. मेहेत्रे अंजली अजय इ. ९ वी (क), तसेच संयोजकांनी विद्यालयाचे प्राचार्य व कलाशिक्षक यांचा प्रशस्ती पत्रक व स्मृतीचिन्ह देऊन योग्य तो गौरव केला आहे. स्पर्धेत सहभाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांना कलाशिक्षक मदने ज्ञानेश्वर यांनी मार्गदर्शन केले आहे. स्पर्धा यशस्वीतेसाठी विद्यालयाच्या प्राचार्या सौ. आरण्ये वंदना व उप प्राचार्य वारुळे चंद्रकांत व पर्यवेक्षिका सौ. गायकवाड मनीषा यांनी मार्गदर्शन केले.

स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शन करणारे शिक्षक यांचाही संस्थेच्या प्रमुख कार्यवाह श्रीमती छायाताई फिरोदिया, सहकार्यवाहक गौरव फिरोदिया, खजिनदार प्रकाश गांधी, शाळा समिती अध्यक्ष नंदकुमार झंवर, शाळा समिती सदस्य रवींद्र बाकलीवाल व संस्थेचे इतर पदाधिकारी, प्राचार्या सौ. आरण्ये वंदना यांनी अभिनंदन केले आहे.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यांत येते कि, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली मिळकत विक्रीचा व्यवहार सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी आमचे अशिलाबरोबर केलेला आहे व त्यापोटी विद्यमान मालकांनी आमच्या अशिलाकडून विसारापोटी रक्कम स्विकारलेली आहे. सदर मिळकत निर्वेध, निजोखमी आहे व सदर मिळकतीबाबत कुठलाही वाद चालू नाही अथवा प्रलंबित नाही व सदर मिळकतीवर कुठल्याही बँकेचे, पतसंस्थेचे अथवा वित्तीय संस्थेचे कर्ज नाही. असे मिळकतीचे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा सदर मिळकतीबाबत गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बॅक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीन, इजमेंट अन्वये कोणाचेही हक्क व अधिकार असल्यास अथवा सदर मिळकतीबाबत इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून **७ दिवसांचे** आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहेत त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मग त्यानंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी. ही नोटीस प्रसिध्दीस दिली. ता.११/१०/२०२५

**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन** :: जिल्हा अहिल्यानगर, पोटतुकडी अहिल्यानगरपैकी, अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील, **मौजे बोल्हेगांव** येथील **बिगरशेती प्लॉट मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे**–
**सर्व्हे नं. ६७/२/२ मधील बिगरशेती प्लॉट खालीलप्रमाणे**–

| प्लॉट नंबर | क्षेत्रफळ चौ.मीटर | चतुःसिमा | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | पूर्व | दक्षिण | पश्चिम | उत्तर |
| ३१ | ३४७.५० | प्लॉट नं.२७ ते ३० | १२.०० मीटर रुंदीचा रस्ता | प्लॉट नं.३२ | ओपन स्पेस |
| ३२ | ३४६.६६ | प्लॉट नं.३१ | १२.०० मीटर रुंदीचा रस्ता | लागू सर्व्हे नं.६७/१ | ओपन स्पेस |

**वर नमूद दोन्ही प्लॉट मिळकतीचे विद्यमान मालक – बबनराव मुरलीधर कातोरे**
रा. प्लॉट नं.एम–३१ , छत्रपती बंगला, गांधीनगर, बोल्हेगांव, अहिल्यानगर.

**ॲड. समीर वखारे**
पत्ता :– ऑफीस नं.५, पहिला मजला, साई कॉर्नर बिल्डींग, चितळे रोड, अहमदनगर.
मो. नं. ९०११६७८९९९,९८६०८०५५५९



## जाहीर नोटीसीस हरकत

तमाम लोकांस व विशेष करून ॲड. **श्री. प्रणव सुधीर धर्माधिकारी, ॲड. सौ.नुतन प्रणव धर्माधिकारी, पत्ता. भंडारी सावज अपार्टमेंट, कोठी रोड,** अहिल्यानगर व त्यांचे अशिल यांस प्रस्तुत जाहीर नोटीसीस हरकतीद्वारे कळविण्यात येते की, जिल्हा अहमदनगर पोटतुकडी व तालुका नगर पैकी जिल्हा परिषद हद्दीतील **मौजे निमगांव वाघा येथील गट नं.४३६/१ चे क्षेत्र २ हे.१८ आर + पो.ख. ० हे.२० आर असे एकुण क्षेत्र २ हे.३८ आर याचा आकार ३ रु.७० पैसे. यापैकी पुर्वे कडील बाजुचे क्षेत्र ० हे.६० आर + पो.ख. ० हे.०५ आर असे एकूण क्षेत्र ० हे.६५ आर या संजय शंकरराव जंजाळे रा. माळीवाडा, अहिल्यानगर यांच्या** मालकीच्या मिळकतीबाबत तारीख ०४/१०/२०२५ रोजी दैनिक नवा मराठा या वर्तमान पत्रामध्ये **ॲड. श्री. प्रणव सुधीर धर्माधिकारी, ॲड. सौ.नूतन प्रणव धर्माधिकारी** यांच्या मार्फत जाहिर नोटीस प्रसिध्दीस दिलेली आहे. सदर जाहीर नोटीसीमध्ये नमूद मिळकतीबाबत मिळकतीचे मालक संजय शंकरराव जंजाळे व त्यांचे बंधू किरण शंकरराव जंजाळे यांनी आमचे अशिल **श्री किरण जगन्नाथ निकम, रा. आदर्श कॉलनी, सावेडी, अहिल्यानगर** यांच्या बरोबर मिळकत विक्रीचा व्यवहार केला असून सदर मिळकतीचे साठेखत आमच्या अशिलास लिहून दिलेले आहे व आमच्या अशिलाकडून सदर साठेखतावर विसारादाखल मोठी रक्कम स्विकारलेली आहे. आमचे आशिल सदर मिळकतीचे साठेखतधारक असून सदर मिळकत खरेदी घेण्याचा कायदेशीर अधिकार आमच्या अशिलास आहे. सदर साठेखत अस्तित्वात असून कुठल्याही प्रकारे रद्दबातल झालेले नाही व आमच्या अशिलाने सदर जाहीर नोटीस देण्यास सांगितलेले नाही. त्यामुळे अशा परिस्थितीमध्ये **ॲड. श्री. प्रणव सुधीर धर्माधिकारी, ॲड. सौ.नूतन प्रणव धर्माधिकारी** यांच्या अशिलांनी सदर जाहीर नोटिसीमध्ये नमुद शेतजमिनीचा व्यवहार करुन खरेदीखत केल्यास त्यांना कुठल्याही कायदेशीर मालकीहक्क, अधिकार, टायटल व ताबा मिळणार नाही याची नोंद **ॲड. श्री. प्रणव सुधीर धर्माधिकारी, ॲड. सौ.नूतन प्रणव धर्माधिकारी** यांनी व त्यांच्या अशिलानी घ्यावी. विनाकारण कोणाचीही फसवणूक होऊ नये या हेतूने प्रस्तुत जाहीर नोटीसीस हरकत प्रसिध्द केली असे.

येणे प्रमाणे जाहिर नोटीसीस हरकत प्रसिध्द केली आहे.

ता. ११/१०/२०२५.
अहिल्यानगर

**ॲड. समीर वखारे**
पत्ता :– ऑफीस नं.५, पहिला मजला, साई कॉर्नर बिल्डींग, चितळे रोड, अहमदनगर.
मो. नं. ९०११६७८९९९,९८६०८०५५५९


# शिक्षक परिषदेची दिवाळीपूर्वी वेतन व निवृत्तीवेतन वितरणाची मागणी; ३ टक्के महागाई भत्ता समाविष्ट करून शासन आदेश तात्काळ काढावेत

### बाबासाहेब बोडखे यांची मागणी



नगर – महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या वतीने मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, शिक्षण मंत्री, शिक्षण सचिव आणि शिक्षण आयुक्तांना निवेदन पाठवून ऑक्टोबर २०२५ महिन्याचे नियमित वेतन तसेच सेवानिवृत्ती वेतन दिवाळीपूर्वी ३ टक्के वाढीव महागाई भत्त्यासह वितरित करण्याची मागणी राज्य सरकारकडे करण्यात आली आहे. याबाबत शासनाने शासनाने तातडीने आदेश निर्गमित करण्याच्या मागणीचे निवेदन माजी शिक्षक आमदार तथा राज्य कार्याध्यक्ष नागो गाणार यांनी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, शालेय शिक्षण मंत्री, शिक्षण सचिव व शिक्षण आयुक्तांना पाठविल्याची माहिती जिल्हाध्यक्ष बाबासाहेब बोडखे यांनी दिली.

निवेदनात म्हटले आहे की, राज्य शासनाने जुलै २०२५ पासून तीन टक्के वाढीव महागाई भत्ता लागू केला असला, तरी अद्याप त्याचा लाभ अनेक शिक्षक व कर्मचाऱ्यांना मिळालेला नाही. म्हणूनच ऑक्टोबर २०२५ चे वेतन आणि सेवानिवृत्ती वेतन देताना वाढीव महागाई भत्ता समाविष्ट करावा, अशी शिक्षक परिषदेची मागणी आहे.

दिवाळी हा भारतीय संस्कृतीतील सर्वात मोठा आनंदोत्सव असून, १८ ते २३ ऑक्टोबर दरम्यान हा सण उत्साहात साजरा केला जाणार आहे. त्या पार्श्वभूमीवर शिक्षक व निवृत्त कर्मचाऱ्यांना दिवाळीपूर्वी संपूर्ण वेतन मिळणे अत्यावश्यक असल्याचे निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.

